Hiring Graphic Designer
Fresher
Location: Alibag
Share your resume & portfolio on:
connect@digitrekkers.in | 9130374573

रायगड, बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

HIRING ALERT
Looking For 2 waiters, 2 house boy
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

## वेधक

### पर्यटकांची दादागिरी, स्थानिकाला मारहाण

**श्रीवर्धन :** पर्यटनासाठी आलेल्या पुणे जिल्ह्यातील तरुणांनी दिवेआगर-श्रीवर्धन परिसरात दादागिरी करत स्थानिक शेतकऱ्याला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना गोंडघर येथील एचपी पेट्रोल पंपाजवळ सोमवारी सकाळी घडली. किरकोळ कारणावरून सुरू झालेल्या वादाचे रूपांतर थेट जमावाकडून हल्ल्यात झाले असून या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वडवली येथील शेतकरी प्रणय दिलीप किर (४२) हे म्हसळा दिशेने जात असताना सोमवारी सकाळी सुमारे ९.१५ वाजता पेट्रोल पंपाजवळील चहाच्या टपरीसमोर एक कार (एमएच १४ केडब्ल्यू ८६३१) रस्त्याच्या कडेला उभी पान २ वर

### भोंदू खरातची ५७ बनावट खाती

**नाशिक :** भोंदू अशोक खरात याच्या प्रकरणात आणखी एक धक्कादायक खुलासा समोर आला आहे. देवदर्शनाच्या नावाखाली भाविकांकडून घेतलेल्या आधार व पॅनकार्डचा गैरवापर करून त्याने समता पतसंस्थेत तब्बल ५७ बनावट खाती उघडल्याचे तपासात समोर आले आहे. यापैकी ३५ खात्यांची चौकशी पूर्ण झाली असून सुमारे ९० टक्के स्वाक्षऱ्या संशयास्पद आढळल्या आहेत. बनावट सह्यांच्या आधारे मोठे आर्थिक व्यवहार झाल्याचा पोलिसांना संशय आहे. दरम्यान, या प्रकरणात रुपाली चाकणकर आणि प्रतिभा चाकणकर यांची नावे समोर आली असून, त्यांच्यावर कारवाईची मागणी होत आहे.

### मुंबईत एकाच दिवशी तीन हत्या

**मुंबई :** मुंबईमध्ये रविवारी एकाच दिवशी तीन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या हत्यांनी खळबळ उडाली आहे. दादर, माटुंबा आणि खेरवाडी परिसरात या घटना घडल्या. दादरमध्ये जुन्या वैमनस्यातून अंकुश आंबेकर (२८) याची पत्नीसमोरच सात जणांनी मारहाण करून हत्या केली. माटुंग्यात पार्किंगच्या वादातून नरेश वाघेला (६५) यांना मारहाण करून ठार करण्यात आले. तर, खेरवाडीत अभिनव चौधरी याची जुन्या वादातून धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली. तिन्ही प्रकरणांत पोलिसांनी काही आरोपींना अटक केली असून, उर्वरितांचा शोध सुरू आहे. एकाच दिवशी घडलेल्या या घटनांमुळे मुंबईकरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### नितीश कुमार पायउतार

**पाटणा :** सर्वाधिक काळ बिहारचे मुख्यमंत्री राहिलेल्या नितीश कुमार यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. सुशासन बाबू अशी ओळख असलेल्या नितीश कुमार यांनी त्यांचा राजीनामा राज्यपालांकडे सुपूर्द केला. यापुढे ते राज्यसभेत दिसतील. काही दिवसांपूर्वीच त्यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाची शपथ घेतलेली आहे. तब्बल २० वर्षे त्यांनी मुख्यमंत्रीपद भूषवलं. बिहारमध्ये सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. गेल्याच वर्षाच्या अखेरीस झालेल्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वात सत्ताधारी एनडीएला दणदणीत बहुमत मिळालं होतं.

# वहूर जेट्टी वादात

## निकृष्ट कामामुळे अडीच कोटी सावित्री नदीत ‘वाहणार’





### सागरी मंडळावर गंभीर आरोप

**जुनेद तांबोळी**
**। महाड ।**

महाड तालुक्यातील वहूर येथे उभारण्यात आलेल्या जेटीच्या कामात मोठा गैरव्यवहार उघडकीस आला आहे. निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे तब्बल २.५ कोटी रुपयांचा निधी वाया जाण्याची शक्यता व्यक्त होत असून, महाराष्ट्र सागरी मंडळाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

महाड तालुक्यातील सव येथील गरम पाण्याच्या कुंडांना जाण्यासाठी सावित्री नदी पार करावी लागते. यासाठी पर्यटकांच्या सोयीसाठी वहूर येथे जेटी उभारण्याचे काम महाराष्ट्र सागरी मंडळाकडून हाती घेण्यात आले होते. मात्र, हे काम पूर्ण होण्याआधीच निकृष्ट दर्जामुळे वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. सुमारे २ कोटी ४२ पान २ वर

### रस्त्यातच विद्युत खांब; प्रशासन बेफिकीर?

जेटीकडे जाणाऱ्या नव्या काँक्रिट रस्त्याच्या मधोमधच विद्युत खांब उभा असल्याचे समोर आले आहे. तो न हटवता रस्ता बांधण्यात आल्याने प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्न उपस्थित झाले आहेत. संबंधित खांब हलवण्यासाठी खर्च कोण करणार, यावरही संभ्रम आहे.

### निकृष्ट काम, अधिकाऱ्यांची ‘संमती’?

जेटी आणि रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असतानाही सागरी मंडळाचे अधिकारी ठेकेदाराची पाठराखण करत असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. संपूर्ण प्रकरणात अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असल्याचे चित्र समोर येत आहे.

# महामानवाला अभिवादन!

(छायाचित्र : समीर मालोदे)



● भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त अलिबागमध्ये नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. दरम्यान, जिल्हाभरातही विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.
सविस्तर बातम्या पान ६ वर.

# ‘दैनिक कृषीवल’चा पुरस्काराने गौरव



● कलाविश्व फाऊंडेशनच्या तपपूर्ती सोहळ्याप्रसंगी ‘दैनिक कृषीवल’ वृत्तपत्राचा वृत्तगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. जि.प.च्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे, पीएनपीचे प्रा. डॉ. ओमकार पोटे यांच्या हस्ते संपादिका माधवी सावंत यांनी हा सन्मान स्वीकारला. यावेळी कृषीवलचे सुयोग आंग्रे, वैभव पाटील, संतोष राऊळ, केदार गुरव, मानसी गोतावडे, समीर मालोदे उपस्थित होते. सविस्तर वृत्त पान ३ वर.

# जाखमाता मंदिराला धोका?



- वेलशेतमध्ये रिलायन्सकडून ‘अवैध’ सुरुंग
- ग्रामस्थांचा आरोप, संताप व्यक्त

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणे जवळील वेलशेत गावातील जाखमाता मंदिर परिसरात सुरुंग लावण्याचे कथित अवैध काम सुरू असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मंदिराच्या सुरक्षिततेसह सार्वजनिक मालमत्तेला धोका निर्माण झाल्याचा इशारा देत ग्रामस्थांनी हे काम तात्काळ बंद करण्याची मागणी केली असून, आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

रोहा तालुक्यातील वेलशेत गावची ग्रामदेवता असलेल्या जाखमाता मंदिर परिसरात सध्या मोठा वाद निर्माण झाला आहे. रिलायन्स कंपनीकडून त्यांच्या विस्तारित प्रकल्पासाठी कंत्राटी कामगारांची कॉलनी उभारण्याचे काम सुरू आहे. मात्र, या बांधकामासाठी खडकाळ भागात खोदकाम पान २ वर

# कळंबोलीचे कोविड रुग्णालय धूळखात





- कोट्यवधींचे साहित्य वापराविना
- अरविंद म्हात्रेंनी केलेल्या पाहणीत गंभीर वास्तव उघड

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

कोविड काळात नागरिकांच्या उपचारासाठी उभारलेले कळंबोली येथील अत्याधुनिक रुग्णालय सध्या धूळखात पडून असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. कोट्यवधींचे साहित्य वापराविना असल्याने संताप व्यक्त होत असून, रुग्णालय तात्काळ सुरू करण्याची मागणी जोर धरत आहे.

पनवेल महानगरपालिकेकडून कोविड काळात उभारण्यात आलेले कळंबोली येथील रुग्णालय सध्या पूर्णपणे बंद अवस्थेत असल्याचे उघड झाले आहे. या रुग्णालयात अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, खाटा आणि इतर साहित्य मोठ्या प्रमाणात पडून असून, त्याचा कोणताही वापर होत नसल्याचे पाहणीदरम्यान स्पष्ट झाले. माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या सूचनेनुसार पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी सोमवारी (दि. १३) सहकारी नगरसेवकांसह रुग्णालयाची पाहणी केली. या पाहणीत कोट्यवधी रुपयांची यंत्रसामग्री धूळखात पडून असल्याचे गंभीर पान २ वर


# डिकसळमधील माती उत्खननाला ब्रेक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील डिकसळ येथे सुरू असलेल्या बेकायदा डोंगर फोड आणि माती उत्खनन प्रकरणाला अखेर ब्रेक लागला आहे. ‘कृषीवल’मध्ये बातमी प्रसिद्ध होताच प्रशासन खडबडून जागे झाले असून, उत्खनन तात्काळ बंद करण्यात आले आहे. महसूल विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

कर्जत-कल्याण राज्य मार्गालगत असलेल्या डिकसळ गावातील टेकडीवर गेल्या दोन महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात माती उत्खनन सुरू होते. या प्रकाराबाबत सोशल मीडियावर सातत्याने तक्रारी होत होत्या. विशेष म्हणजे, संबंधित जमीन मालकांची कोणतीही परवानगी न घेता त्यांच्या जमिनीतून माती काढली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. ही बाब उघड होताच स्थानिक शेतकऱ्यांनी थेट जिल्हाधिकारी आणि कर्जत तहसीलदारांकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर महसूल पान २ वर

कृषीवल इफेक्ट



### महसूल प्रशासनाची चौकशी सुरू

#### ‘सही’वर संशय, प्रकरण अधिकच गडद

या उत्खननासाठी स्वामित्व शुल्क भरताना संबंधित शेतकऱ्यांच्या नावाने करण्यात आलेल्या सही बनावट असल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. एका सातबारा धारक शेतकऱ्याने स्पष्ट आक्षेप घेत, ‘‘माझी कोणतीही परवानगी घेतली नाही, तसेच माझ्या नावाची सहीही खोटी आहे,’’ असा दावा केला आहे. यामुळे संपूर्ण प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात अडकले असून, महसूल विभागाची भूमिका संशयास्पद ठरत आहे.

# अकृषक परवानगीत गोंधळ कायम

- शासन निर्णय धाब्यावर
- दुहेरी परवानगीमुळे भूधारक संतप्त

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

राज्य सरकारने अकृषक (एनए) परवानगी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी कायद्यात मोठा बदल करूनही प्रत्यक्षात मात्र जुन्याच पद्धतीने कामकाज सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. मुंबई महानगर क्षेत्रामधील भूधारकांना अजूनही दुहेरी परवानगीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असून, शासन निर्णयाची उघडपणे पायमल्ली होत असल्याने संतापाची लाट उसळली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ लागू होऊन चार महिने उलटून गेले असतानाही अकृषक परवानगी प्रक्रियेत कोणताही बदल झालेला नसल्याचे समोर आले आहे. दुहेरी परवानगी टाळण्यासाठी आणि प्रक्रिया सुलभ करण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात नागरिकांना अजूनही जुन्याच क्लिष्ट प्रक्रियेला सामोरे जावे लागत आहे. पान २ वर

## शिवसमाधीस्थळी प्रि-वेडिंग शूटचा व्हिडिओ व्हायरल | संतप्त शिवप्रेमींचा उद्रेक

# रायगडाची पवित्रता धुळीस?

**। महाड । उदय सावंत ।**

महाराष्ट्राच्या अस्मितेचा किल्ला मानल्या जाणाऱ्या रायगड किल्ल्यावरील वरील पवित्र शिवसमाधी परिसरात प्रि-वेडिंग शूट केल्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. श्रद्धास्थानाचा अवमान झाल्याची भावना व्यक्त करत शिवप्रेमींनी तीव्र निषेध नोंदवला असून, दोषींवर तात्काळ कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

इतिहास, स्वाभिमान आणि श्रद्धेचे प्रतीक असलेल्या रायगड किल्ल्यावर पुन्हा एकदा वादंग निर्माण झाला आहे. शिवसमाधी परिसरात एका जोडप्याने प्रि-वेडिंग शूट केल्याचा व्हिडिओ



सोशल मीडियावर व्हायरल होताच वातावरण तापले आहे. व्हिडिओमध्ये संबंधित जोडपे समाधी परिसरात चित्रिकरण करताना स्पष्ट दिसत आहे. या प्रकारामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या यांच्या पवित्र स्मृतींना धक्का बसल्याची भावना व्यक्त होत आहे. ‘‘हे केवळ शूट नाही, तर महाराष्ट्राच्या अस्मितेचा अपमान आहे,’’ अशा तीव्र शब्दांत नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

> “महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या गडकिल्ल्यांवर अशा प्रकारचे प्रि-वेडिंग शूट तात्काळ बंद करण्यात यावे. शिवसमाधीस्थळी झालेले हे कृत्य निषेधार्ह असून, संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी.”
> – शुभम कनोजे, द. रायगड सचिव, युवासेना गडकिल्ले संवर्धन कक्ष

या वादग्रस्त प्रकरणावर राज्याचे मंत्री भरत गोगावले यांनीही कठोर भूमिका घेतली आहे. ‘‘रायगडावर प्रि-वेडिंग किंवा अशा प्रकारचे कोणतेही शूटिंग अजिबात सहन केले जाणार नाही. ज्यांनी हे कृत्य केले त्यांनी तात्काळ माफी मागावी,’’ असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. तसेच, किल्ल्यावर तैनात असलेल्या सुरक्षा यंत्रणेकडून काही हलगर्जीपणा झाला असल्यास संबंधित सुरक्षा कर्मचाऱ्यांवर कारवाई करून बदल करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शिवप्रेमी आणि विविध संघटनांकडून रायगडावरील संवेदनशील भागांमध्ये पान २ वर

# रिक्षाचालकांना मराठी अनिवार्य

## १ मेपासून निर्णयाची अंमलबजावणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

येत्या १ मेपासून सर्व परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा वाचता आणि लिहिता येणे बंधनकारक करण्यात येणार असल्याचे सांगितले. मोटार परिवहन विभागाकडून राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून, चालकांच्या मराठी ज्ञानाची पडताळणी केली जाणार आहे. या निर्णयाची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली.

नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येणार असून, नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई महानगर क्षेत्रासह इतर शहरांमध्ये प्रवाशांशी मराठीत संवाद साधता न येण्याच्या वाढत्या तक्रारींमुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. तसेच, ‘‘ज्या प्रदेशात आपण राहतो त्या प्रदेशाची भाषा शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे,’’ असेही त्यांनी नमूद केले.

मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून, अशा चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा मंत्री सरनाईक यांनी दिला आहे. या निर्णयामुळे राज्यातील परिवहन व्यवस्थेत स्थानिक भाषेला प्राधान्य मिळणार असून, प्रवासी आणि चालक यांच्यातील संवाद अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कॅबमध्ये ड्रग्ज, इव्हेंटमध्ये ओव्हरडोस

## ● मुंबईत ड्रग्ज रॅकेटला कोणाचा आशीर्वाद?

| मुंबई | प्रतिनिधी |

गोरेगाव येथील नेस्को परिसरात उघडकीस आलेल्या ड्रग्ज पार्टी प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. विद्यार्थ्यांनी कॅबमध्येच ड्रग्सचे सेवन करणे, एमडीसारख्या घातक पदार्थांचा वापर करणे आणि त्यातून ओव्हरडोस होऊन प्रकृती बिघडणे. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक व धक्कादायक आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ते तथा युवकचे मुंबई अध्यक्ष ॲड. अमोल मातेले यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल करत गंभीर आरोप केले आहेत.

ॲड. अमोल मातेले म्हणाले, ''मुंबईसारख्या महानगरात विद्यार्थ्यांपर्यंत ड्रग्ज इतक्या सहजपणे पोहोचत असतील, तर हे सरकारचे पूर्ण अपयश आहे. कल्याण परिसरातून ड्रग्ज मागवले जातात, इव्हेंटमध्ये खुलेआम सेवन केले जाते, आणि प्रशासनाला काहीच सुगावा लागत नाही. हे अत्यंत लाजिरवाणे आहे. हे फक्त काही विद्यार्थ्यांचे प्रकरण नाही, तर यामागे मोठे ड्रग्ज रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. या रॅकेटला कोणाचे संरक्षण आहे? कोणत्या राजकीय दबावाखाली हे प्रकार सुरू आहेत? याची सखोल चौकशी झालीच पाहिजे! पोलीस फक्त अटक दाखवून जबाबदारी संपली असे समजत असतील, तर ते चुकीचे आहे. १५ ते १६ विद्यार्थ्यांचा सहभाग, पुरवठादारांची साखळी हे सर्व पाहता ही केवळ हिमनगाची टोक आहे.''

''राज्य सरकारने तात्काळ विशेष तपास पथक स्थापन करून संपूर्ण ड्रग्ज नेटवर्क उद्ध्वस्त करावे. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल. महाराष्ट्रातील तरुणाईला ड्रग्जच्या विळख्यातून वाचवण्यासाठी आम्ही कुठल्याही टोकाला जाऊ!''

### उच्चस्तरीय चौकशी करा

ड्रग्ज पुरवठा साखळीचा संपूर्ण भांडाफोड करावा. संबंधित पोलीस व प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावीशैक्षणिक संस्थांमध्ये अँटी-ड्रग्ज मोहीम तातडीने राबवावी, महाराष्ट्राला ड्रग्जमुक्त करणे ही सरकारची जबाबदारी आहे आणि त्यात अपयश आल्यास जनता माफ करणार नाही, असे ॲड. अमोल मातेले म्हणाले.

# रासायनिक भंगार, मेडिकल वेस्टला भीषण आग

## ●सुदैवाने मोठा अनर्थ टळला

| रोहा | प्रतिनिधी |

कुंडलिका नदीच्या पुलाजवळ अष्टमी नदी काठी टाकण्यात आलेल्या रासायनिक भंगार आणि मेडिकल वेस्ट मटेरियलला अचानक भीषण आग लागल्याची दुर्दैवी घटना घडली. या आगीमुळे परिसरात धुराचे लोट पसरून नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले होते. धुरामुळे नागरिकांना श्वास घेण्यात त्रास जाणवू लागला होता. या घटनेची माहिती समजताच अग्निशमन दलाला पाचरण करण्यात आले. अग्निशमक दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत एका तासात आग आटोक्यात आणल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

अष्टमी नाक्यावर नदीकिनारी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने मोठ्या प्रमाणात केमिकल मटेरियल, मेडिकल वेस्ट आणि भंगार आणून टाकले होते. सोमवारी (दि.१३) रोजी रात्रीच्या सुमारास या कचऱ्याला अचानक आग लागली. केमिकल आणि प्लास्टिक असल्याने ही आग प्रचंड धुमसत होती. केमिकलच्या उग्र वासामुळे आजूबाजूच्या नागरिकांना गुदमरल्यासारखे होत होते.

या घटनेची माहिती समजताच रोहा नगर परिषदेचे सभापती महेंद्र दिवेकर, सभापती नीताताई हजारे, नगरसेवक प्रशांत कडू, नगरसेविका फराहा पानसरे, अकिब येरुणकर, रोहित हजारे, सागर भोबड, बंटी चांदगावकर व अन्य नागरिकांनी धाव घेत मदत कार्याला सुरुवात केली.

घटनास्थळी मेडिकल लॅब वेस्ट, आईस पॅड्स, औषधांच्या बाटल्या आणि सलाईनचा मोठा साठा जळत असल्याचे दिसून आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग विझवली.



(छायाचित्र: गौसखान पठाण)

# कळंब-करचुंडे वाड्यांना रस्त्याची प्रतीक्षा

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील कळंब व करचुंडे येथील आदिवासी वाड्यांमध्ये नागरिकांना जाणे-येण्यासाठी अद्याप रस्ता उपलब्ध नाही. स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही या वाड्यांमध्ये रस्त्याची सुविधा नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

नागरिकांनी प्रयत्न करून रस्ता ज्यांच्या जमिनीतून जाणार आहे त्यांची संमती घेतली असूनही काम सुरू झालेले नाही. प्रधानमंत्री सडक योजनेतून मंजूर झालेला रस्ता अद्याप प्रत्यक्षात सुरू झालेला नाही. संबंधित शेतकऱ्यांकडून कोणतीही तक्रार नसतानाही रस्ता सुरू होण्यात विलंब होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मंजुरी मिळून एक वर्ष उलटले असून, पावसाळा तोंडावर आल्यामुळे आदिवासी वाड्यातील लोकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागणार आहे.

या वाड्यांतील नागरिकांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. शाळेत जाणाऱ्या मुलांना रोजच्या प्रवासात अडथळे येतात. रुग्णालयात जाणाऱ्या आजारी व्यक्तींना वेळेवर उपचार मिळणे कठीण होते. शेतीमाल बाजारात नेणाऱ्या शेतकऱ्यांना वाहतुकीच्या साधनांचा अभाव असल्याने आर्थिक नुकसान सहन करावे लागते. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिक बिकट होते. चिखल, पाण्याचे लोट आणि वाहतुकीची साधने नसल्याने नागरिकांना गावाबाहेर जाणे कठीण होते.

स्थानिक नागरिकांनी शासनाने मंजूर केलेल्या रस्त्याचे काम त्वरित सुरू व्हावे, अशी मागणी केली आहे. अन्यथा या आदिवासी वाड्यांतील नागरिकांना आपला आवाज पोहोचवण्यासाठी उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# बंदर कामगारांचे प्रश्न तात्काळ सोडविण्याची मागणी

| उरण | प्रतिनिधी |

अखिल भारतीय बंदर आणि गोदी कामगारांच्या राष्ट्रीय समन्वय समितीची बैठक ज्येष्ठ कामगार नेते एस.के. शेट्टे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी जेएनपीएच्या विश्रामगृहात पार पडली. या बैठकीत प्रामुख्याने बंदर कामगारांच्या वेतन आणि बोनस, बढती तसेच भविष्य निर्वाह निधीतील वाढ या मागण्यांवर सरकार आणि बंदर प्रशासनाने लवकरात निर्णय घेण्याची जोरदार मागणी करण्यात आली.




या बैठकीसाठी देशातील अकरा बंदरातील पाच बंदर कामगार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जेएनपीएचे कामगार नेते व बीएमएसचे राष्ट्रीय महासचिव सुरेश पाटील, विश्वस्त दिनेश पाटील, रवींद्र पाटील, माजी विश्वस्त कॉ. भूषण पाटील, कामगार नेते सुधीर घरत, गणेश घरत आदी उपस्थित होते. बंदर विभागाकडून २०२०-२१ ते २०२५-३६ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी लागू होणारा बोनस करार मंजूर करण्यात आला आहे. मात्र त्याची अंमलबजावणी केली जात नाही. यामध्ये उचल वजा करून उर्वरित रक्कम संबंधितांना परत देण्याचेही मान्य करण्यात आले आहे.

या बैठकीला भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघ,ऑल इंडिया पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशन, इंडिया फोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशन, वॉटर ट्रान्सपोर्ट वर्कर्स फेडरेशन ऑफ इंडिया, इंडियन नॅशनल पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशन, पोर्ट डॉक अँड वॉटर फ्रंट फेडरेशन ऑफ इंडिया यांचे नेते उपस्थित होते. बंदर कामगारांच्या विविध मागण्या प्रलंबित असून देशातील सहा बंदर कामगार महासंघाच्या वतीने सरकार आणि बंदर व्यवस्थापनाशी चर्चा करूनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही होताना दिसत नाही. प्रशासन केवळ आश्वासन देण्यात येत आहे.

# अध्यक्षपदी राजेंद्र गायकवाड

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

जिल्हा परिषद सहकारी पतपेढीच्या अध्यक्षपदाची निवडणूक शुक्रवारी (दि.१०) घेण्यात आली. या निवडणुकीत राजेंद्र गायकवाड यांची बहुमतांनी निवड झाली. १३ पैकी नऊ मते मिळवून त्यांनी विजय मिळविला. प्रभारी अध्यक्ष व उपाध्यक्ष वैभव पाटील, सेक्रेटरी सुदिन कांबळे, आरोग्य कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अमोल खैरनार यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्याकडे पदभार सुपूर्द केला. यावेळी पतपेढीचे संचालक सुनील घुटे, महेंद्र पुगावकर, स्नेहल मोरे, निलेश कार्लेकर, दीपक देवरुखकर, अमरदीप ठोंबरे आदी उपस्थित होते.

# पिरवाडी किनाऱ्यावर पाच पर्यटकांची मृत्यूशी झुंज

| उरण | प्रतिनिधी |

तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेला पिरवाडी किनारा पुन्हा एकदा एका थरारक घटनेमुळे चर्चेत आला आहे. सोमवारी संध्याकाळी समुद्रात फिरायला गेलेले पाच पर्यटक भरतीमुळे खडकांमध्ये अडकले होते. मात्र, सागर सुरक्षा रक्षकांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे या पाचही जणांचे प्राण वाचवण्यात यश आले आहे.

सोमवारी संध्याकाळी काही पर्यटक उत्साहाच्या भरात किनाऱ्यापासून लांब असलेल्या खडकांवर गेले होते. यावेळी समुद्राला भरती आल्याने पाण्याचा वेढा वाढला आणि हे पर्यटक मध्येच अडकून पडले. जीवाची भीती निर्माण झाल्याने पर्यटकांनी मदतीसाठी आरडाओरडा सुरू केला. यावेळी तिथे तैनात असलेल्या सागर सुरक्षा रक्षकांनी कोणतीही वेळ न घालवता तातडीने धाव घेतली आणि पाचही पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढले.

पिरवाडी किनाऱ्यावर वर्षभर पर्यटकांची मोठी गर्दी असते. येथे खाण्यापिण्याची आणि मनोरंजनाची उत्तम सोय असली, तरी प्रशासकीय उदासीनता स्पष्टपणे दिसून येत आहे. किनाऱ्यावर कुठेही धोक्याच्या सूचना देणारे फलक नसल्याने नवीन येणाऱ्या पर्यटकांना पाण्याचा आणि खडकांचा अंदाज येत नाही. अनेकदा उत्साहाच्या भरात पर्यटक खोल पाण्यात किंवा खडकांवर जातात आणि आपला जीव धोक्यात घालतात. पिरवाडी किनाऱ्यावर पर्यटकांना योग्य दिशा मिळावी आणि असे अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठिकठिकाणी माहिती फलक आणि इशारा देणारे बोर्ड लावावेत, अशी मागणी स्थानिक आणि पर्यटकांकडून केली जात आहे. सोमवारी झालेल्या या घटनेत केवळ सुरक्षा रक्षकांच्या तत्परतेमुळे सर्वांचे प्राण वाचले.


### जाहिर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे अंत्राट तर्फे वरेडी, ता कर्जत, जि रायगड येथील जमीन मिळकतीचे मालक श्री मनोज एकनाथ घारे यांचेकडून खालील वर्णनाची जमीन मिळकत विकत घ्यावयाचे ठरविलेले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकूण क्षेत्र हे.आर.पा. | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ८१ | १/ब | ०.७०.०० पैकी श्री मनोज एकनाथ घारे यांचे मालकीचे क्षेत्र ०.३५.०० | ०.१९ |

सबब सदर नोटीसीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास, सदर मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक १५/०४/२०२६

**ॲड. रूपेश एकनाथ पाटील**
बी. ए. एल. एल बी
शिव ओम अपार्टमेन्ट, गाळा नं १०
कचेरी रोड, मुर्दे बु, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९०९६०६०४०४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. किशोर दामोदर कोळी व सौ. पुजा किशोर कोळी दोघेही रा. मातोश्री निवास, कोळीवाडा-पेण, पेण-रायगड यांनी खालील वर्णनांचा वाणिज्य गाळा हा सदर गाळ्याचे विद्यमान मालक श्री. निशीकांत गोपिनाथ पोटे रा. स्वराज्य रेसिडेन्सी, २०८, दुसरा मजला, शंकर नगर, पेण, पेण-रायगड यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

मिळकतीचे वर्णन जिल्हा रायगड, तालुका पेण, नगर परिषद पेण, मौजे पेण (विठ्ठल आळी) येथील सिटी सर्व्हे नं. २८८ मधील आर.सी.सी. इमारतीतील तळ मजल्यावरील वाणिज्य गाळा क्षेत्र ३१०.५० चौ. फुट कारपेट अधिक पोटमाळा क्षेत्र १०३.५० चौ. पु १. फुट एकुण क्षेत्र ४१४ चौ. फुट हा या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरचा वाणिज्य गाळा हा निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही गाळ्याचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील गाळ्याबाबत जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून ८ (आठ) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर हरकत न आल्यास सदरचा वाणिज्य गाळा हा निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचा, कसल्याही प्रकारचा कायदेशीर हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल सदर गाळ्याचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. १५/०४/२०२६.

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६.
तळ मजला, शिवाजी पथ,
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९


## पान १ वरून

### वहूर जेटी वादात

लाख रुपयांचे हे काम पोलादपूर येथील एस.जे. कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात नवीन जेटी उभारण्याऐवजी जुन्या जेटीवर केवळ सहा इंच काँक्रिट टाकून काम पूर्ण केल्याचे दाखवण्यात आल्याचा आरोप आहे. यासोबतच वाळूऐवजी ग्रिटचा वापर करून दर्जाहीन बांधकाम करण्यात आल्याचेही समोर आले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, काम सुरू असताना सागरी मंडळाचा एकही अभियंता किंवा अधिकारी प्रत्यक्ष जागेवर उपस्थित नव्हता. त्यामुळे ठेकेदाराने मनमानी करत घाईघाईत काम पूर्ण केल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

जेटीकडे जाणाऱ्या रस्त्याचे कामही वादग्रस्त ठरले आहे. काँक्रिट रस्त्यासाठी निकृष्ट दर्जाचा डबर वापरण्यात आल्याचे समोर आले असून, याबाबत गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून चौकशी होणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

वहूर जेटी प्रकरणामुळे पुन्हा एकदा सार्वजनिक कामांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. अडीच कोटी रुपयांचा निधी अक्षरशः पाण्यात जाण्याची वेळ आली असताना, संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर नेमकी काय कारवाई होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

खासगी प्लॉटधारकाला फायदा?

या प्रकरणातील सर्वात गंभीर आरोप म्हणजे, जेटीच्या नावाखाली सावित्री नदीत संरक्षक भिंत उभारण्यात आली, मात्र ती प्रत्यक्षात एका खाजगी प्लॉटधारकाच्या फायद्यासाठी असल्याची चर्चा रंगली आहे. शासनाचा निधी वापरून खाजगी मालमत्तेला संरक्षण देण्यात आल्याचा आरोप होत असून, यामुळे प्रकरण अधिकच संशयास्पद बनले आहे.

रस्ता खासगी जमिनीतून; 'सुविधा' की संगनमत?

जेटीकडे जाणारा रस्ता देखील संबंधित खाजगी प्लॉटधारकाच्या जमिनीतून तयार करण्यात आला आहे. त्यामुळे त्या प्लॉटला थेट रस्त्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचा आरोप होत आहे. हा सर्व प्रकार नियोजनबद्ध संगनमतातून झाला का, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

### जाखमाता मंदिराला धोका?

करताना अवैधरित्या सुरुंग लावले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी भेट देऊन कामगार व कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे सुरुंग लावण्याची परवानगी विचारण्यात आली असता कोणतीही लेखी परवानगी दाखविण्यात आली नाही. त्यामुळे या कामाची वैधता संशयाच्या भोवऱ्यात आली आहे.

या कथित सुरुंगकामामुळे मंदिराला तडे जाण्याचा आणि गंभीर नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, मंदिरालगतच हे काम सुरू असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. याशिवाय नागोठणेअलिबाग राज्य मार्गावरील अंबा नदीवरील पुलालाही याचा फटका बसू शकतो, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

गाव पंच कमिटीचे अध्यक्ष जयेश बावकर, उपाध्यक्ष गंगाराम पारंगे, सचिव रमेश पारंगे यांच्यासह ग्रामस्थांनी नागोठणे पोलीस ठाण्यात निवेदन देत हे काम तात्काळ थांबवण्याची मागणी केली आहे. ग्रामस्थांच्या आक्रमक भूमिकेमुळे सध्या हे काम तात्पुरते थांबवण्यात आल्याची माहिती आहे.

दरम्यान, मंदिरासमोरील जागा सोडण्याचे आश्वासन कंपनी प्रशासनाने यापूर्वी दिले होते. मात्र त्या आश्वासनाला हरताळ फासून त्याच जागेत बांधकामासाठी खड्डे खोदण्यात आल्याने ग्रामस्थांचा संताप अधिकच वाढला आहे. ''आम्ही मेलो तरी चालेल, पण मंदिरासमोरील ही जागा सोडणार नाही. गरज पडल्यास तीव्र आंदोलन छेडू,'' असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या प्रकरणाच्या प्रती जिल्हाधिकारी, रोहा प्रांत कार्यालय आणि तहसील कार्यालयाला पाठवण्यात आल्या असून, आता प्रशासन आणि संबंधित कंपनी यावर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न निष्फळ ठरला.

### डिकसळमधील माती उत्खननाला ब्रेक

प्रशासनाने तातडीने दखल घेत पोलिसांच्या उपस्थितीत घटनास्थळी पाहणी केली. या पाहणीत प्रत्यक्ष परिस्थिती समोर आल्यानंतर संबंधित उत्खनन कामावर तात्काळ बंदी घालण्यात आली.

डिकसळ गावाच्या हद्दीतील टेकडीवर सुरू असलेल्या या उत्खननामुळे पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतल्यामुळे प्रशासनाला कारवाई करावी लागली.

दरम्यान, या प्रकरणात महसूल विभागाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. कर्जत तहसील कार्यालयाने तब्बल १८०० ब्रास माती उत्खननासाठी रॉयल्टी मंजूर केली होती. मात्र, ज्या सातबारा उताऱ्यावर ही परवानगी देण्यात आली, त्या जमिनीच्या मालकांची कोणतीही संमती घेतली नव्हती, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. यामुळे ''परवानगी नेमकी कोणाच्या आधारे देण्यात आली?'' हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. संबंधित शेतकऱ्यांनी या संपूर्ण व्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

'कृषीवल'च्या दणक्याने आणि शेतकऱ्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे अखेर बेकायदा उत्खनन थांबले असले, तरी या प्रकरणातील जबाबदारांवर ठोस कारवाई होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अकृषक परवानगीत गोंधळ कायम

पूर्वीच्या तरतुदींनुसार, जमिनीच्या अकृषिक वापरासाठी महसूल विभागाची स्वतंत्र परवानगी आणि सनद आवश्यक होती. यामुळे वेळ, खर्च आणि कागदपत्रांचा मोठा बोजा नागरिकांवर पडत होता. याच पार्श्वभूमीवर शासनाने २०२५ मध्ये कायद्यात सुधारणा करत अनेक जुनी कलमे रद्द करून प्रक्रिया सुलभ केली.

या सुधारणेनुसार, नियोजन प्राधिकरणाकडून विकास परवानगी किंवा बांधकाम आराखडा मंजूर झाल्यास महसूल विभागाची स्वतंत्र अकृषक परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही, अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. तसेच, वार्षिक अकृषक कर रद्द करून एकरकमी रुपांतरण अधिमूल्य (प्रिमियम) भरण्याची व्यवस्था लागू करण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्षात या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना अजूनही अकृषक परवानगीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात पाठवले जात आहे. त्यामुळे शासनाचा निर्णय केवळ कागदावरच राहिला आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

विशेषतः ठाणे, पालघर, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली आणि भिलवडी या महानगरपालिका क्षेत्रांमध्ये हा प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे समोर आले आहे.दुहेरी परवानगीची सक्ती आणि त्यातून निर्माण होणारा आर्थिक बोजा यामुळे भूधारकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ''सरकारने प्रक्रिया सुलभ करण्यासाठी निर्णय घेतला, पण अधिकारी मात्र त्याकडे दुर्लक्ष करत आहेत,'' अशी भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामुळे भ्रष्टाचाराला खतपाणी घातले जात असल्याचीही चर्चा रंगू लागली आहे. शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

कायद्यात बदल करूनही जर प्रत्यक्ष अंमलबजावणीच होत नसेल, तर अशा निर्णयांचा उपयोग काय, असा सवाल उपस्थित होत आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून ही विसंगती दूर करावी, अन्यथा भूधारकांचा संताप अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

### कळंबोलीचे कोविड रुग्णालय धूळखात

वास्तव समोर आले आहे.

कोविडसारख्या गंभीर संकटात उभारण्यात आलेली ही सुविधा सध्या वापरात नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. पाहणीनंतर अरविंद म्हात्रे यांनी महापालिका आयुक्तांशी चर्चा करत रुग्णालय तात्काळ सुरू करण्याची मागणी केली. ''कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेले रुग्णालय बंद ठेवणे ही गंभीर बाब आहे. नागरिकांच्या आरोग्यासाठी ही सुविधा त्वरित कार्यान्वित करणे गरजेचे आहे,'' असे अरविंद म्हात्रे यांनी स्पष्ट केले.

नगरसेवकांनीही हे रुग्णालय सर्वसामान्यांसाठी अत्याधुनिक उपचार केंद्र म्हणून सुरू करावे, अशी मागणी केली आहे. तसेच आवश्यक मनुष्यबळ आणि वैद्यकीय यंत्रणा उपलब्ध करून देत लवकरात लवकर रुग्णालय कार्यान्वित करावे, असा आग्रह धरण्यात आला आहे.

### रायगडाची पवित्रता धुळीस?

अशा प्रकारच्या शूटिंगवर कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी जोर धरत आहे. केंद्रिय पुरातत्त्व विभाग आणि स्थानिक प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी स्पष्ट नियमावली तयार करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

सोशल मीडियावर ''रायगडाची पवित्रता जपा'' या हॅशटॅगखाली संतापाची लाट उसळली असून, हा व्हिडिओ खरा आहे का आणि संबंधितांनी शूटसाठी अधिकृत परवानगी घेतली होती का, याची चौकशी होण्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पर्यटकांची दादागिरी, स्थानिकाला मारहाण

होती. त्यांनी संबंधितांना गाडी पुढे घेण्याची विनंती केली असता, पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील तरुणांनी ''गाडी पुढे घेणार नाही, काय करायचं ते करा'' असे म्हणत शिवीगाळ सुरू केली.

क्षणातच वाद विकोपाला गेला आणि ओंकार आनंदा शिवळे, वेदांत संतोष शिवळे, अभिषेक रविंद्र शिवळे यांनी किर यांच्यावर लाथाबुक्क्यांनी हल्ला चढवला. दरम्यान, त्यांना वाचवण्यासाठी पुढे आलेल्या अब्दुल रेहमान घराडे (रा. कुडकी) व नासी इब्राहिम खान (रा. वडवली) यांनाही आरोपींनी सोडले नाही. संकेत दत्तात्रेय आंद्रे व तेजस लालाजी पठारे यांनी प्लास्टिक स्टूलने पाठीवर वार करत मारहाण केली.

यानंतर स्वयम ज्ञानेश्वर नानेकर, अभिषेक कैलास यळवंडे, गौरव नवनाथ यळवंडे व गौरव मुरलीधर यळवंडे हेही घटनास्थळी येत जमाव वाढला आणि हल्ल्याची तीव्रता अधिक वाढली. या अमानुष मारहाणीत प्रणय किर यांच्या चेहऱ्यावर, डाव्या डोळ्याजवळ, पाठीवर व पायावर गंभीर दुखापती झाल्या. गोंधळाच्या दरम्यान त्यांची सोन्याची चैन तुटून गहाळ झाल्याचीही नोंद आहे. याप्रकरणी दिघी सागरी पोलीस ठाण्यात नऊ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार कारवाई सुरू आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक अशोक भास्कर म्हात्रे यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वरंडे, ता. अलिबाग | १८३ | ०-११-०० वरकस<br>०-००-०० पो.ख.<br>०-११-०० एकुण | ०.१९ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्मान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १५/०४/२०२६

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. पो. नागांव,ता.अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल केतकी अनंत म्हसकर उर्फ केतकी चंद्रशेखर भडसावळे रा. वरई तर्फ वरेडी, घर नं. १६४, ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१. यांनी खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे खालील नमुद विदयमान मालक यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे - वरई तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| विजय बाळकृष्ण हरड | २८/१ | ०.८५.७०<br>पोट खराबा ०.०८.९०<br>एकुण क्षेत्र ०.९४.६० पैकी<br>लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०.१२.७०<br>पोट खराबा ०.०८.९०<br>एकुण क्षेत्र ०.२१.६० | १५.२०<br>२.२५ |

सदर मिळकतीच्या लिहुन देणार यांच्या मालकीच्या एकूण क्षेत्रापैकी रस्त्याच्या वहिवाटीकरिता दिलेले क्षेत्र २३० फुट लांबी X१४ फुट रूंदी (अंदाजे ०.०३.०० गुंठे क्षेत्र)

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा - कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे

तारीख :- १५/०४/२०२६

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को. ऑप. हौसिंग सोसायटी
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

## निवडक



### तळोजा, नावडेतील बाजार हटवला

**पनवेल :** महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाच्यावतीने तळोजा फेज-१, सेक्टर-१० येथे अनधिकृत आठवडा बाजारावर कारवाई करण्यात आली आहे. याठिकाणी कारवाईनंतर पुन्हा बाजार भरला जाऊ नये, यासाठी अतिक्रमण विभागाचे कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. ही कारवाई अतिक्रमण निर्मूलन विभागाच्यावतीने उपविभाग नावडे अंतर्गत घोटगाव येथील अनधिकृत बाजारांवर करण्यात आली. याठिकाणीदेखील पुन्हा बाजार भरला जाऊ नये, यासाठी अतिक्रमण कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत. आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार व त्यांच्या सुचनेनुसार सहाय्यक तसेच उपायुक्त नानासाहेब कामठे आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी प्रभाग अधिकारी मनोज चव्हाण यांनी अनधिकृत आठवडे बाजारासाठी आलेल्या फेरीवाले, हातगाड्यांवर तोडक कारवाई करून आठवडा बाजार बंद केले आहेत.



### कागदपत्र पडताळणीदरम्यान गोंधळ

**पनवेल :** पंचायत समिती कार्यालयात शाळेतील प्रवेशासाठी लागणाऱ्या कागदपत्र पडताळणी प्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. त्यामुळे याठिकाणी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. पनवेल पंचायत समिती कार्यालयात योग्य नियोजनाचा अभाव आणि अपुरी व्यवस्था यामुळे पालकांना तासन्तास रांगेत थांबावे लागले होते. अनेक पालक आपल्या लहान मुलांसह आले होते. त्यांना उकाड्यात प्रचंड त्रास सहन करावा लागला. तसेच या ठिकाणी बसण्याची, पिण्याच्या पाण्याची व सावलीची सुविधा नसल्याने पालकांमधून नाराजी व्यक्त करण्यात आली. प्रशासनाकडून वेळापत्रकाचे योग्य नियोजन न झाल्याने पंचायत समिती कार्यालयात एकाच वेळी मोठी गर्दी उसळली होती. कार्यालयातील कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या आणि मार्गदर्शनाचा अभाव यामुळे प्रक्रिया अधिकच संथ झाली होती. त्यामुळे पालकांनी संताप व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने योग्य व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे.



### नेरळमधील सराईत चोरट्याला अटक

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील विविध भागांत चोरी प्रकरणी अनेक गुन्हे दाखल आहेत. याबाबत नेरळ पोलिसांनी धडाकेबाज कामगिरी करताना मंगळसूत्र चोरी आणि सोन्याच्या चेन चोरणाऱ्या सराईत चोरट्याला ताब्यात घतले आहे. तसेच, या चोरट्याकडून तब्बल १२ गुन्ह्यांची उकल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नेरळमधील अंबिका नाका येथे दि.३० मार्च रोजी दुपारच्या सुमारास पायी जालत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन व मंगळसुत्र चोरट्याने मोटारसायकलवरून येऊन जबरीने हिसकावून नेले. या घटनेची नोंद झाल्यावर नेरळच्या गुन्हे प्रकटीकरण टीमने तांत्रिक माहितीच्या आधारे या चोरट्यापर्यंत पोहचले. प्रविण पाटील (४१) असे सराईत चोरट्याचे नाव असून तो शेलू येथील वाटिका सोसायटीमध्ये वास्तव्यास आहे. तसेच, त्याच्याकडून १० ग्रॅमची सोन्याची चेन व १० ग्रॅमचे मंगळसुत्र असे अंदाजे १ लाख रुपये किमतीचे सोने ताब्यात घेण्यात आले. त्याच्यावर बदलापूर, कोनगाव, मुंब्रा, बडनेरा पोलीस ठाण्यात जबरी चोरी, चोरी असे एकूण १२ गुन्हे दाखल आहेत. त्याचवेळी अन्य काही गुन्ह्यांची उकल देखील होण्याची शक्यता आहे. या तपासाबद्दल रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी नेरळचे प्रभारी पोलीस अधिकारी आणि गुन्हे प्रकत्रीकरण टीमचे अभिनंदन केले आहे.


# हेटवणे कालव्यावरील पूल चोरीला

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील हेटवणे कालव्यावरील दहा लोखंडी पूल चोरीला गेले आहेत. परंतु, लाखो रुपयांचे साहित्य चोरीला जाऊनही जलसंपदा विभागाने दाखवलेली ढिलाई संतापजनक ठरत आहे. अधिकारी भेट टाळणे, केवळ अर्जावरच समाधान मानणे आणि एफआयआर नोंदवण्यास टाळाटाळ केल्यामुळे प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत.

हेटवणे कालव्यावरील लाखो रुपयांचे जुने साहित्य लंपास झाल्याचे वृत्त समोर आल्यानंतर जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची धावपळ अपेक्षित होती. मात्र, उलटपक्षी अधिकारी भेट टाळत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. 'कृषीवल'च्या प्रतिनिधींनी चार वेळा कार्यालयात जाऊनही अधिकाऱ्यांनी मुद्दाम भेट टाळल्याचे दिसून आले. अखेर पाचव्या प्रयत्नात संबंधित कामावर देखरेख करणारे अधिकारी अल्पेश पाटील यांनी भेट दिली.

## लाखोंचा ऐवज लंपास, तरीही एफआयआर नाही!



हेटवणे कालव्यावरील दहा लोखंडी पूलाचे लाखो रुपयांचे साहित्य चोरीला गेले आहे. त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे याबाबत पेण पोलीस ठाण्यात साधा तक्रार अर्ज दाखल करण्यात आल्याचे संबंधित अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे केवळ चार ओळींच्या अर्जावर संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

या भेटीत त्यांनी दिलेल्या माहितीतून अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. लाखो रुपयांचा सरकारी ऐवज चोरीला गेल्यानंतरही ६ मार्च रोजी पेण पोलीस ठाण्यात साधा तक्रार अर्ज दिल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, इतक्या मोठ्या घटनेनंतरही रीतसर एफआयआर नोंदवण्यात आलेला नाही. त्यामुळे लाखोंचे साहित्य गायब झाले असताना केवळ चार ओळींच्या अर्जावर प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, हे पूल अत्यंत जड स्वरूपाचे असून, ते हटवण्यासाठी जेसीबी किंवा पोकलेनसारख्या यंत्रांची आवश्यकता भासते.

अशा परिस्थितीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर दहा पूल चोरीस जाणे सहज शक्य नाही. त्यामुळे हा प्रकार साधी चोरी नसून, नियोजनबद्ध कारवाई असल्याचा संशय व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या मते, ठेकेदारांच्या यंत्रसामुग्रीच्या सहाय्यानेच हे पूल काढण्यात आले असावेत. असे असताना संबंधित अधिकाऱ्यांना याची कल्पना नसणे किंवा त्यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, हेही तितकेच गंभीर आहे.

या प्रकरणामुळे जलसंपदा विभागाच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून हा प्रकार निष्काळजीपणा आहे की जाणीवपूर्वक चालढकल, याची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे. यावेळी अल्पेश पाटील यांनी 'कृषीवल'शी बोलताना सांगितले की, या प्रकरणाबाबत पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज देण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस यंत्रणा करत आहे.

## साडेपाच लाखांचे हेरॉईन जप्त

**| पनवेल | प्रतिनिधी |**

कळंबोली पोलिसांनी अंमली पदार्थविरोधी कारवाई करत सुमारे ५ लाख ६७ हजार रुपये किमतीचे हेरॉईन जप्त केले असून या प्रकरणी दोघांना अटक केली आहे. तिसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मार्बल मार्केट परिसरातील झोपडपट्टीजवळ काही जण हेरॉईन विक्रीसाठी आणणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून कारवाई केली. त्यात रोहित राजभान सिंग उर्फ रुबी आणि जमील मोहम्मद वालामनसा चौधरी यांना ताब्यात घेतले. त्यांच्याजवळून मोठ्या प्रमाणात हेरॉईन जप्त केले. दोघांविरोधात गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली असून तिसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून अंमली पदार्थांच्या विरोधात पोलिसांनी मोहीम अधिक तीव्र केली आहे.

# रायगडावरील गाढवांचे हाल

■ मृत गाढवांना उघड्यावर टाकण्याचा प्रताप

**| महाड | प्रतिनिधी |**



किल्ले रायगडच्या विकासासाठी करोडो रुपये मंजूर झाल्यानंतर या ठिकाणी गेल्या काही वर्षांपासून विविध विकास कामे सुरू आहेत. गडावर जाण्यासाठी सुमारे चौदाशे हून अधिक पायऱ्या असून, काही ठिकाणी उभा सरळ चढ आहे. अशा पायऱ्या सर करताना माणसाला दमछाक होते. अशा ठिकाणी गाढवांच्या पाठीवर शेकडो किलोचे ओझे लादून गडावर नेले जाते. या गाढवांचा सोशल मीडियावर कौतुकाचा विषय व्हायरल झाला आहे. परंतु, प्रत्यक्षात मात्र या ठिकाणी गाढवांचे प्रचंड हाल होताना दिसत आहेत. रायगड सर करताना या गाढवांच्या तोंडाला फेस येतो, तरी देखील न थांबता या गाढवांचा प्रवास दिवस-रात्र सुरूच असतो. ठेकेदार गाढवांच्या आरोग्याकडे लक्ष न देता केवळ बिल लादण्यातच गुंग झाले आहेत. त्यामुळे गाढवांचा मृत्यू झाल्याच्या घटना अनेकदा घडल्या आहेत. याचदरम्यान, महाड-रायगड रस्त्यावर जुन्या कोंझर घाटामध्ये दहा-पंधरा फुट दरीमध्ये मृत झालेली सुमारे पाच-सहा गाढवं निर्दयीपणे उघड्यावर टाकून दिलेली आहेत. त्यामुळे या घाटामध्ये दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

## उरण आगारात 'स्मार्ट' सुविधा

**| उरण | प्रतिनिधी |**

तालुक्यातील प्रवाशांच्या सोयीसाठी उरण एसटी आगारात स्मार्ट कार्ड काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या कार्डच्या माध्यमातून प्रवाशांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार असून, भविष्यात सवलतींसाठी हे कार्ड अनिवार्य असणार असल्याचे आगार प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या योजनेअंतर्गत महिलांना ५० टक्के सवलत, ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध आहे.

## बॉक्साईड वाहतुकीचा हैदोस

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन-म्हसळा मार्ग सध्या अपघातांचा हॉटस्पॉट बनला आहे. ओव्हरलोड बॉक्साईडची अवैध आणि बेफाम वाहतूक सर्वसामान्यांच्या जीवावर उठली आहे. रविवारी (दि.१२) सकाळी झालेल्या एका भीषण अपघातात झाला. त्यामुळे श्रीवर्धनमध्ये होणाऱ्या वारंवार अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

श्रीवर्धनमध्ये अवैध बॉक्साईड ट्रक माफियांचा हैदोस दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. त्यातच श्रीवर्धन-म्हसळा या मार्गावर होणाऱ्या बॉक्साईड ट्रकच्या अपघातांमुळे येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. रविवारी सकाळी म्हसळा-सकलप दरम्यान धोकादायक उतारावर बॉक्साईडने गच्च भरलेल्या एका अवजड ट्रकचा अपघात झाला. उतारावर चालकाचे नियंत्रण सुटले आणि ट्रक थेट रस्त्याच्या कडेला जाऊन आदळला. या भीषण अपघातात ट्रकचा क्लिनर माझा अझर करमटणी (२६) गंभीर जखमी झाला. या ट्रकवरील चालकांच्या डोळ्यांत दिसणारी नशा आणि त्यांची बेदरकार ड्रायव्हिंग यामुळे येथील नागरिक भयभीत झाले आहेत.

## मतदान नोंदणी, दुरूस्ती अभियान

**| नेरळ | प्रतिनिधी |**



राज्य निवडणूक आयोगाने दोषमुक्त मतदान याद्या तयार करण्यावर भर दिला आहे. याच माध्यमातून माथेरान शहरात मतदान नोंदणी करण्यावर भर देण्यात आला आहे. बीएलओ सचिन भोईर आणि नगरसेविका रिझवाना शेख यांच्या पुढाकाराने कॅम्प लावून नवीन मतदार नोंदणी आणि दुरुस्ती करून घेण्यावर भर देण्यात आला आहे. माथेरान मध्ये नवीन मतदार नोंदणी आणि मतदार दुरुस्ती तसेच सदोष मतदार यादी तयार करण्यासाठी राज्य निवडणूक आयोग यांच्याकडून प्रयत्न सुरु केले आहे. या मोहिमेच्या अंतरंगात माथेरान येथे शिबीर घेण्यात आले होते. बीएलओ म्हणून नियुक्त करण्यात आलेले नगरपरिषद शाळेचे शिक्षक सचिन भोईर यांच्या उपस्थितीत हे मतदार नोंदणी शिबीर घेण्यात आले. या शिबिरासाठी माथेरानच्या नगरसेविका रिझवाना शेख यांनी शहरातील नागराईकांना या शिबिरासाठी आवाहन केले होते. या शिबिरामध्ये माथेरान शहरातील २०० हुन अधिक नागराईकांनी आपले मतदान ओळखपत्र आणि नवीन नोंदणी व दुरुस्तीची कामे पूर्ण केली.

## पगार मागितल्याने एकाला दमदाटी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

एक सिव्हिल इंजिनिअर पगार मागण्यास काम करत असलेल्या कंपनीत गेला असता त्याला शिवीगाळ आणि दमदाटी करण्यात आली. प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मेहकर शमशाद शेख असे त्याचे नाव असून तो धारावी येथे वास्तव्यास आहे. तो किरण एंटरप्रायजेस कंपनीत सिव्हिल इंजिनिअर म्हणून काम करत होता. तो याठिकाणी ५५ हजार रुपये पगारावर ४ महिने काम करत आहे. कंपनीने २ महिन्यांपासून पगार न दिल्याने शेखने याबाबत विचारणा केली. मात्र, त्याला शिवीगाळ करत दमदाटी करण्यात आली.

# कला विश्व फाऊंडेशनतर्फे पुरस्कार देऊन सन्मान



(छायाचित्र : समीर मालोदे)

**| रायगड | प्रतिनिधी |**

कला विश्व फाऊंडेशनच्या तप पूर्ती सोहळ्याप्रसंगी जनसामान्यांच्या हक्काचे व्यासपीठ असणाऱ्या 'दैनिक कृषीवल' वृत्तपत्राचा वृत्तगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. रायगड जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे, पीएनपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांच्या हस्ते दैनिक कृषिवलच्या संपादिका माधवी सावंत यांनी हा सन्मान स्वीकारला.

कला विश्व फाऊंडेशनच्या तप वर्ष पूर्ती सोहळ्यानिमित्त मंगळवारी (दि.१४) काव्य स्पर्धा, बक्षीस वितरण व पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी काव्य स्पर्धेत सहभाग घेतलेल्या स्पर्धकांनी आपल्या कविता सादर केल्या. त्याला उपस्थित प्रेषकांनी उदंड साद दिली. त्याचबरोबर विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी वृत्तगौरव पुरस्कार 'दैनिक कृषीवल', कला चेतना पुरस्कार जयवंत गायकवाड व तैसीम चाफेकर, काव्यरत्न पुरस्कार सुचिता बागडे-खाडे व प्रतीक्षा थळे, कला गौरव पुरस्कार किरण साष्टे, गौरांगी पाटील व योगेश पवार, सागररत्न पुरस्कार अंबर नाखवा आणि क्रीडा रत्न पुरस्कार सृष्टी पाटील यांना मान्यवर अतिथींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान, कला विश्व फाऊंडेशनचे संस्थापक प्रणित म्हात्रे यांनी प्रास्ताविकात फाऊंडेशनच्या गेल्या बारा वर्षातील प्रगतीचा धावता आलेख मांडला. तसेच, फाऊंडेशनचा भविष्यातील नियोजनात्मक आराखडा देखील उपस्थितांसमोर मांडला. सामाजिक वैषम्यता दूर करणे प्रत्येक सुजाण नागरिकांची जबाबदारी आहे. यासाठी प्रशासकीय यंत्रणांना सहकार्य केले तर आपण चांगला समाज घडवू शकू, असे आवाहन प्रणित म्हात्रे यांनी केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे, अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, दैनिक कृषीवलच्या संपादिका माधवी सावंत, पीएनपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, देवेंद्र केळुस्कर, गजानन पाटील, विपुल पाटील, सन्मान पाटील, ॲड. प्रमोद पाटील, पराग पाटील, हर्षल म्हात्रे, मनस्वी म्हात्रे, विनायक देशपांडे, दीप पाटील आदी उपस्थित होते.

## चोरट्यांचे पोलिसांना खुले आव्हान | संतापलेल्या श्रीवर्धनकरांचा एल्गार

# आकाशातून होणार चोरांची शिकार

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहराला सध्या चोरांच्या टोळीने वेढले असून, सर्वसामान्य नागरिकांची झोप उडाली आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरात चोरीच्या घटनांनी अक्षरशः कहर केला असून, हे चोरटे थेट घरांचे दरवाजे ठोठावून पोलिसांच्या कार्यक्षमतेला उघड आव्हान देत आहेत. त्यामुळे संतापलेल्या श्रीवर्धनकरांनी आता आक्रमक पवित्रा घेतला असून, डोंगरदऱ्यांत लपलेल्या चोरांचा शोध घेण्यासाठी चक्क ड्रोनच्या साहाय्याने सर्जिकल स्ट्राईक करण्याची तयारी केली आहे.



शनिवारी (दि.११) मध्यरात्री विठ्ठल आळी आणि बंदर गोठण परिसरात चोरट्यांच्या एका टोळीने धुमाकूळ घातला. हातात लोखंडी सळ्या आणि धारदार शस्त्रे घेऊन हे चोरटे भरवस्तीत शिरले. त्यांनी चक्क रहिवाशांच्या घराचे दरवाजे ठोठावून भीतीचे वातावरण निर्माण केले. मात्र, श्रीवर्धनच्या जागरूक नागरिकांनी वेळीच सतर्क होत आरडाओरडा केल्यामुळे चोरांनी अंधाराचा फायदा घेत जवळच असलेल्या डोंगराच्या दिशेने पळ काढला. यापूर्वी सुरेश कर्णेकर यांच्या घरावर दरोडा टाकून चोरांनी दागिने आणि रोख रक्कम लंपास केली होती. त्याचा तपास अद्यापही प्रलंबित आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांकडून पोलीस यंत्रणेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, येथील नागरिकांनी पोलीस ठाण्यावर धडक देऊन 'केवळ आश्वासन नको, तर चोरांच्या मुसक्या आवळा', अशा संतप्त भावना देखील व्यक्त केल्या आहेत. तसेच, डोंगरदऱ्यांत लपलेल्या चोरांचा शोध घेण्यासाठी चक्क ड्रोनच्या साहाय्याने सर्जिकल स्ट्राईक करण्याची तयारी केली आहे.

**सीसीटीव्ही शोभेच्या बाहुल्या?**

शहराच्या सुरक्षिततेसाठी लाखो रुपये खर्चून बसवण्यात आलेले नगरपरिषदेचे सीसीटीव्ही कॅमेरे सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. पंधरा कॅमेऱ्यांपैकी अनेक कॅमेरे नादुरुस्त असल्याचे वास्तव समोर आले आहे. एकीकडे नगरपरिषद फुटेज दिल्याचे सांगत असली, तरी प्रत्यक्ष गुन्हेगारांपर्यंत पोहोचण्यात हे कॅमेरे कुचकामी ठरत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

> **"आम्ही आता गप्प बसणार नाही. जर पोलीस यंत्रणा हतबल ठरत असेल, तर आम्ही तंत्रज्ञानाच्या जोरावर चोरांना डोंगरातून खेचून बाहेर काढू. श्रीवर्धनची शांतता भंग करणाऱ्यांना धडा शिकवल्याशिवाय नागरिक स्वस्थ बसणार नाहीत.**
> **– स्थानिक नागरिक"**

## भ्रष्ट अधिकाऱ्यांना बढती न देण्याची मागणी

**| उरण | प्रतिनिधी |**

राज्यातील मत्स्योद्योग आधीच युद्धजन्य परिस्थितीमुळे खिळखिळा झाला असताना, त्यावर मत्स्य विभागातील कथित भ्रष्टाचाराने आणखी मीठ चोळल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस येत आहे. तरी अशा मत्स्यव्यवसायाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना बढती न देण्याची संतप्त मच्छिमारांची मागणी जोर धरू लागली आहे.

डिझेलच्या वाढत्या दरामुळे अनेक मच्छिमारांना बोटी बंदरात उभ्या ठेवण्याची वेळ आली आहे. अशा बिकट काळात प्रशासनाने धावून येणे अपेक्षित असताना, काही अधिकारी रजेवर, तर काही एसी ऑफिसमध्ये बसून कारभार करत असल्याचा आरोप मच्छिमारांकडून होत आहे. विशेषतः सहाय्यक आयुक्त संजय पाटील आणि उरणचे परवाना अधिकारी सुरेश बाबुलगावे यांच्या भूमिकेवर संशयाची सुई रोखली गेली आहे. याहून धक्कादायक म्हणजे, या अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीची चर्चा सुरू असल्याने मच्छिमारांमध्ये संताप उसळला आहे. घोटाळे करणाऱ्यांना बढती, आणि प्रामाणिक मच्छिमारांना संकट? असा संतप्त सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.

# दिल्लीत कामगारांचा उद्रेक

दिल्लीजवळ नॉयडा हे मुंबईजवळच्या नवी मुंबईसारखे जोडशहर आहे. हद्दीच्या दृष्टीने ते उत्तर प्रदेशामध्ये येते. पण दिल्लीचाच भाग झाले आहे. किंबहुना, जागतिक पातळीवरील अनेक महत्वाच्या कंपन्या आणि अनेक उच्चभ्रू मंडळी नॉयडामध्ये राहतात. नरेंद्र मोदी यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी घेतलेला गोदी मिडिया उर्फ सर्व टीव्ही वाहिन्यांची कार्यालयेही नॉयडामध्येच आहेत. अनेक नामांकित कंपन्यांचे कारखाने तसेच आयटी कंपन्याही तिथे आहेत. अशा या नॉयडामध्ये परवा कामगारांचा उद्रेक झाला. अनेक कंपन्या व कारखान्यातील कामगार रस्त्यावर आले व त्यांनी आंदोलन केले. दगडफेक केली. गाड्या पेटवून दिल्या. गेल्या आठवड्यात नॉयडामधील अनेक छोट्या कारखान्यांमधील कामगारांनी धरणे आंदोलन केले होते. पगारवाढ ही त्यांची मुख्य मागणी होती. शिवाय कामाचे तास आणि कंपनीतील कामाच्या जागेची स्थिती याबाबतही अनेकांच्या तक्रारी होत्या. त्याबाबत प्रशासनाने या कामगारांसोबत बैठका घेतल्या व त्यांच्या मागण्यांचा विचार केला जाईल असे आश्वासन दिले. पण कामगारांमधील अस्वस्थता कायम होती. सोमवारी तिचाच उद्रेक झाला. औद्योगिक पट्ट्यात चाळीस ते पन्नास हजार कामगार विविध भागात रस्त्यावर उतरले व त्यांनी आंदोलन केले. उत्तर प्रदेशात योगींचे सरकार असल्याने तिथे असंतोष प्रगट करणे हे जोखमीचे असते. आंदोलकांच्या घरावर लगेच बुलडोझर चालवले जातात. तरीही त्याला न जुमानता आंदोलक बाहेर आले. याचाच अर्थ त्यांच्यातील खदखद किती मोठी होती हे लक्षात यावे. त्यामुळेच बहुदा योगी सरकारने आंदोलनाबाबत सावध प्रतिक्रिया दिली आहे. आपण कामगारांसोबत असून त्यांच्या मागण्या रास्त आहेत असे योगी यांना म्हणावे लागले आहे. मात्र या कामगारांना काही जण मुद्दाम भडकावत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. याचा अर्थ या कामगारांचे नेते किंवा काही छोट्या पुढाऱ्यांना उचलून आता आतमध्ये टाकले जाईल व पुन्हा असे काही केले जाऊ नये म्हणून दहशत निर्माण केली जाईल. थेट पोलिसांनी गोळीबार वगैरे करून आंदोलन न दडपता या रीतीने कामगारांना चेपण्याचा हा प्रयत्न निषेधार्ह आहे. दुर्दैवाने याला विरोध करू शकेल असे राजकीय पक्ष वा संघटना आता कमी झालेले आहेत.

## किमान वेतनाची दैना

कालच्या आंदोलनानंतर उत्तर प्रदेश सरकारने मंगळवारी या भागातील कामगारांचे किमान वेतन वाढवले. त्याचे आकडे बोलके आहेत. गौतमबुध्द नगर आणि गाझियाबाद या भागातील अकुशल कामगारांना आता महिना ११ हजार ऐवजी १३ हजार रुपये मिळतील. तर कुशल कामगारांना १६ हजार रुपये मिळतील. याचा अर्थ अकुशल कामगारांना सुमारे साडेतीनशे तर कुशल कामगारांना दिवसाला ५५० रुपये असा नवीन दर असेल. आपल्याकडे महाराष्ट्रात शेतीत काम करणाऱ्या मजुरांनाही बहुदा याच्याहून अधिक पैसे मिळतात. दिल्लीसारख्या महागड्या शहरात राहून दिवसाला इतके कमी पैसे कमावणे आणि त्यातून काही बचत करून कुटुंबाचा प्रतिपाळ करणे हे केवळ अशक्य आहे. हे कामगार ज्या कारखान्यांमध्ये काम करतात तेथील उत्पादने शेकडो कोटींचा धंदा करतात. मालक कित्येक कोटींचे नफे कमावतात. मात्र कामगारांच्या वाट्याला यातील काहीही येत नाही. किंबहुना, कामगारांचे शोषण करूनच हे पैसे उभे राहत असतात. आता जी वाढ होणार आहे ती महिन्याला एक-दोन हजारांची आहे. या देशात राज्यकर्ते हजारो कोटी रुपयांचे आकडे जनतेच्या अंगावर सतत फेकत असतात. भारत हा आता पाच लाख कोटी डॉलरची अर्थव्यवस्था होणार, जगात आपला चौथा क्रमांक असणार वगैरे गोष्टी गर्वाने सांगितल्या जात असतात. पण या देशातील कामगार, शेतकरी आणि शेतमजूर यांची स्थिती अतिशय दयनीय आहे. शेतकऱ्यांना काही जोडधंदा असेल तर ते गावातल्या गावात कसेबसे जगू शकतात. तिथे शहरांच्या मानाने खर्च थोडे कमी असतात. मात्र शहरात राहणाऱ्या कामगारांना घराचे भाडे आणि प्रवासखर्च यामध्येच बराच पैसा खर्चावा लागतो. शहरातील जेवणखाणही कमालीचे महाग असते. त्यातच माणूस आजारी पडला तर तो जन्माचा कर्जबाजारी होऊन बसतो. नोकरीदेखील कायमस्वरुपी मिळाली तर ठीक असते. मध्ये ब्रेक मिळाले किंवा आठवड्यातून चारच दिवस काम मिळाले तर अजून वांदे होतात. नोकरी जाण्याची, कारखाना बंद होण्याची भीती सतत राहते. बरेच दिवस एकाच प्रकारचे काम करून दुसरे काही करता येईनासे होते. पुन्हा शेतीत जायला मन करीत नाही.


## आजूबाजूची संपत्ती

या कामगारांच्या आसपास संपत्तीची संपत्तीची जबरदस्त उधळपट्टी चालू असते. एका जेवणाला पंचतारांकित हॉटेलांमध्ये सहजपणे पाच-दहा हजार म्हणजे यांच्या १५ दिवसांच्या पगाराइतके पैसे खर्च करणारे वावरत असतात. आलिशान गाड्यांवर केली जाणारी आरास यांच्या सहा महिन्यांच्या पगाराइतकी असते. पैसा हवेत नुसता उडत असतो. फक्त तो या कामगारांच्या वाट्याला येत नाही. त्यातून जबरदस्त अस्वस्थता व असंतोष निर्माण होतो. गेल्या दोन महिन्यात उत्तर भारतातल्या चार शहरांमध्ये असा उद्रेक पाहायला मिळाला आहे. दोन फेब्रुवारीला बिहारच्या बेगुसराई जिल्ह्यातील बरौनी येथील तेलशुध्दीकरण कारखान्यात पहिले आंदोलन झाले होते. गुजरातेतील हिऱ्यांवर पैलू पाडणाऱ्या सुरतच्या कारखान्यात, हरियाणातील मानेसरमधील वाहनांचे सुट्टे भाग बनवणाऱ्या कंपन्यांमध्येही असेच प्रकार घडले होते. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये अनेक जुने कामगार कायदे एकत्र करून मोदी सरकारने नवा एकत्रित कामगार कायदा किंवा श्रम संहिता आणली. त्यामुळे कामगारांचे वेतन वाढेल अशी जाहिरात करण्यात आली. खुद्द मोदींनी तशी भाषणे केली. पण प्रत्यक्षात कामगारांचा अनुभव वेगळाच आहे. त्यामुळेच हा असंतोष आणखी वाढला आहे. या कायद्यामुळे अगदी कंत्राटावरील कामगारांचे किमान वेतन वाढेल व त्यांना जागा ओव्हरटाईम मिळू लागेल असे सर्वांना वाटत होते. पण मालकांनी त्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. सरकार कितीही कायदे घेऊन आले तरी मालक मंडळी त्यातून पळवाटा काढतात व सरकारी यंत्रणा त्यांच्याकडे सोईस्कर दुर्लक्ष करते हा नेहमीचा अनुभव आहे. तोच याही वेळी येऊ लागला आहे. कामगारांच्या उद्रेकाचा हाच अर्थ आहे. आज हे दिल्लीत घडत आहे. उद्या हे मुंबईत व इतर शहरांमध्येही होणार आहे. शहरीकरणामुळे नागरिकांचे जीवन सुसह्य होण्याऐवजी प्रवासाचे खर्च व त्रास वाढला आहे. सरकारच्या लेखी महागाई दिसत नसली तरी जागांच्या किमती तसेच भाड्याच्या रकमा दिवसेंदिवस गगनाला भिडत आहेत. शिवाय मोदींच्या कायद्यांमुळे आता तीनशेहून कमी कामगार असतील अशा कारखान्यांना बंद करण्यासाठी परवानगी घ्यावी लागत नाही की कामगारांना काही नोटीस द्यावी लागत नाही. एका दिवसात हे घडू शकते. त्यामुळे असुरक्षितता वाढली आहे. दिल्लीतील उद्रेक हे त्याचे एक उदाहरण आहे. यापूर्वी चेन्नई आणि बंगळुरुमध्ये आयटी उद्योगातही अशी आंदोलने झाली होती. आता तर आयटी कंपन्यांमधून एकाच दिवसात हजारो कामगारांना काढून टाकले जात आहे. दिवस कठीण आहेत.

**विचार**

# युद्ध, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नैतिक प्रश्न

*कृत्रिम बुद्धिमत्ता युद्धाचे स्वरूप पूर्णपणे बदलत आहे. ती युद्ध अधिक वेगवान, अचूक आणि प्रभावी बनवते, परंतु अनेक नैतिक आणि मानवी प्रश्न निर्माण करते. योग्य नियंत्रण नसेल तर हे तंत्रज्ञान मानवतेसाठी मोठा धोका ठरू शकते. कृत्रिम बुद्धिमत्ता एक शक्तिशाली साधन आहे. तिचा उपयोग कसा केला जातो यावर भविष्यातील जग अवलंबून आहे. ती युद्ध अधिक घातक बनवू शकते किंवा शांततेसाठीही उपयुक्त ठरू शकते.*



डॉ. दीपक शिकारपूर

लष्करी आणि गुप्तहेर खात्यांकडून सतत नवीन तंत्रज्ञानाचा पाठपुरावा केला जात असतो. शत्रूच्या एक पाऊल पुढे राहण्याचा हा प्रयत्न असतो. यामुळेच त्यांनी न वापरलेले तंत्रज्ञान कालांतराने इतर संस्था वा व्यक्तींपर्यंत पोहोचते (किंवा काही वेळा ते अधिकृतपणे औद्योगिक वापरासाठी खुलेही केले जाते). मग त्यावर काही व्यक्ती अधिक संशोधन करतात, प्रबंध वा पुस्तके लिहितात आणि अशा प्रकारे माहितीचा प्रसार होत जातो. यात मूळ यंत्रणांचे काहीच नुकसान होत नसल्याने त्या या प्रसाराकडे फारसे लक्ष देत नाहीत. हॅकिंगचे नवनवे मार्ग यातूनच उदयाला येतात. आज सर्वोच्च लष्करी खात्याच्या हाती असलेले तंत्र अशा प्रकारे खाली झिरपायला फक्त तीन ते पाच वर्षे लागतात. एखाद्या यंत्रणेवर हल्ला करणे ही बाब तिचे संरक्षण करण्यापेक्षा निश्चितच अधिक सोपी असल्याने आणि हा मार्ग वापरणारे घुसखोर थेट दिसत नसल्याने सायबर घातपातांचे प्रमाण वाढत आहे. पृथ्वीभोवती आज शेकडो नव्हे, हजारो उपग्रह फिरत आहेत. त्यापैकी बहुतेक उपग्रहांवर हवामानाचा अंदाज देणे आणि या ना त्या बहाण्याने (किंवा उघडपणेही) सर्वत्र नजर ठेवणे एवढेच काम सोपवलेले आहे, असे म्हणायला हरकत नाही. या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सर्वसामान्य नागरिकाच्या अक्षरशः प्रत्येक हालचालीचा मागोवा घेणे शक्य असते. यावर विश्वास बसणे अवघड असले तरी ते सत्य आहे. एकविसाव्या शतकात युद्धाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक युद्धात सैनिक आणि शस्त्रास्त्रांचा वापर महत्त्वाचा होता, परंतु आज कृत्रिम बुद्धिमत्ता युद्धाचा मुख्य घटक बनली आहे. इराण-विरुध्द इस्रायल-अमेरिका संघर्षात याचे स्पष्ट उदाहरण दिसते.

कृत्रिम बुद्धिमत्ता माहितीचे मोठ्या प्रमाणावर विश्लेषण करून लक्ष्य ओळखणे, निर्णय घेणे आणि हल्ल्यांचे नियोजन करणे, यासाठी वापरली जाते. त्यामुळे युद्ध अधिक वेगवान आणि अचूक झाले आहे. एआयमुळे युद्धातील निर्णयप्रक्रिया, लक्ष्य ओळखणे, हल्ल्यांचे नियोजन आणि अंमलबजावणी या सर्व बाबींमध्ये क्रांतिकारी बदल झाले आहेत. काही अहवालांनुसार एआयच्या मदतीने केवळ बारा तासांमध्ये जवळपास ९०० हल्ले करण्यात आले. हे पारंपरिक युद्धात अशक्यप्राय होते. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे युद्धाचा वेग, अचूकता आणि निर्णयक्षमता अभूतपूर्व पातळीवर पोहोचली आहे. अत्यल्प वेळेत लक्ष्य शोधणे, त्याचे विश्लेषण करणे आणि हल्ला करणे शक्य झाले आहे. त्यामुळे युद्ध केवळ शक्तीचे नव्हे तर तंत्रज्ञानाचे झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक किंवा यंत्रांना मानवी बुद्धिमत्तेसारखे विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान. युद्धात याचा उपयोग विविध स्तरांवर केला जातो. मोठ्या प्रमाणावर माहिती संकलन करून तिचे विश्लेषण करणे, शत्रूच्या हालचालींचा अंदाज लावणे, लक्ष्य निश्चित करणे आणि योग्य वेळी हल्ला करणे, या सर्व गोष्टी कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे अत्यंत सोप्या झाल्या आहेत. पूर्वी या सर्व प्रक्रिया मानवी विश्लेषकांवर अवलंबून होत्या. त्या वेळखाऊ आणि कधी कधी अचूक नसत. आता कृत्रिम बुद्धिमत्ता काही क्षणांमध्ये हजारो माहितीबिंदूंचे विश्लेषण करून अधिक अचूक निष्कर्ष देते.

अधिक अचूक हल्ले, जलद निर्णय आणि सैनिकांचे कमी नुकसान हे याचे काही सकारात्मक परिणाम आहेत. चुकीचे लक्ष्य निवडले जाण्याचा धोका, नागरिकांचे नुकसान आणि संघर्ष अधिक वेगाने वाढण्याची शक्यता ही मोठी आव्हाने आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा सर्वात मोठा प्रभाव म्हणजे युद्धातील वेग. पूर्वी लक्ष्य शोधण्यासाठी अनेक दिवस किंवा आठवडे लागत असत. माहिती गोळा करणे, तिचे विश्लेषण करणे आणि निर्णय घेणे ही प्रक्रिया संथ होती. आता मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता काही सेकंदांमध्ये उपग्रह, सेन्सर, संचार प्रणाली आणि इतर साधनांमधून मिळालेली माहिती एकत्र करून योग्य लक्ष्य ओळखते. यामुळे निर्णयप्रक्रिया अत्यंत जलद झाली आहे. युद्धातील ही वेगवान प्रक्रिया संघर्षाची तीव्रता वाढवते. कमी वेळेत अधिक हल्ले करणे शक्य होते. त्यामुळे युद्धाचा कालावधी कमी होऊ शकतो, परंतु त्याची तीव्रता अधिक वाढते. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे अत्यल्प वेळेत मोठ्या प्रमाणावर हल्ले करणे शक्य झाले आहे. काही घटनांमध्ये काही तासांमध्येच शेकडो हल्ले करण्यात आले आहेत. ही गोष्ट पारंपरिक युद्धाच्या तुलनेत पूर्णपणे वेगळी आहे. पूर्वी एका मोठ्या हल्ल्यासाठी मोठी तयारी करावी लागे, वेळ लागे आणि अनेक टप्पे पार करावे लागत. आता ही प्रक्रिया स्वयंचलित झाली आहे. यामुळे युद्ध अधिक आक्रमक झाले आहे. शत्रूला प्रतिक्रिया देण्याची संधी कमी मिळते आणि संघर्ष अधिक तीव्र होतो.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मानवरहित विमान, स्वयंचलित शस्त्रे आणि यंत्रसामग्रीचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. ही साधने स्वतः लक्ष्य शोधू शकतात, त्याचे विश्लेषण करू शकतात आणि आवश्यक असल्यास हल्लाही करू शकतात. यामुळे मानवी सहभाग कमी होतो आणि धोकादेखील कमी होतो. परंतु याच गोष्टीमुळे एक मोठा प्रश्न निर्माण होतो. तो म्हणजे यंत्रांनी स्वतः निर्णय घेतले तर त्यांची जबाबदारी कोण घेणार? कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ रणांगणापुरती मर्यादित नाही. ती सायबर युद्धामध्येही महत्त्वाची भूमिका बजावते. शत्रूच्या संगणकीय प्रणालींवर हल्ला करणे, वीजपुरवठा खंडित करणे, बँकिंग प्रणालीमध्ये अडथळे निर्माण करणे या गोष्टी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने शक्य झाल्या आहेत. तसेच माहिती युद्धामध्येही तिचा मोठा वापर होतो. खोटी माहिती पसरवणे, जनमतावर प्रभाव टाकणे आणि समाजामध्ये गोंधळ निर्माण करणे हादेखील युद्धाचा एक भाग बनला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे युद्धाचा वेग वाढल्यामुळे काही सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम दिसतात. सकारात्मक बाजू म्हणजे हल्ले अधिक अचूक होतात, सैनिकांचे नुकसान कमी होते आणि निर्णय जलद घेतले जातात. परंतु नकारात्मक बाजू अधिक गंभीर आहे. चुकीचे लक्ष्य निवडले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे निरपराध नागरिकांचे नुकसान होऊ शकते. तसेच युद्धाचा वेग इतका वाढतो की त्यावर नियंत्रण ठेवणे कठीण होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर युद्धामध्ये केल्यामुळे अनेक नैतिक प्रश्न निर्माण झाले आहेत. सर्वात मोठा प्रश्न असतो जबाबदारीचा. कृत्रिम बुद्धिमत्तेने चुकीचा निर्णय घेतला, तर त्यासाठी जबाबदार कोण?

मानवी नियंत्रण कमी होत असल्यामुळे युद्धातील मानवी संवेदनशीलता कमी होत आहे. युद्ध अधिक यांत्रिक आणि निर्जीव बनत आहे. भविष्यात युद्ध अधिक स्वयंचलित होण्याची शक्यता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्रे अधिक प्रगत होतील आणि मानवी सहभाग कमी होईल. रोबो सैनिक, स्वयंचलित हल्ले आणि यंत्रांवर आधारित निर्णयप्रक्रिया ही भविष्यातील युद्धाची वैशिष्ट्ये असू शकतात. यामुळे युद्ध अधिक वेगवान आणि अचूक होईल, परंतु त्याच वेळी अधिक धोकादायकही होईल. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे अनेक धोके निर्माण होतात. चुकीचे निर्णय, प्रणालींचे अपयश, सायबर हल्ले आणि नियंत्रण गमावण्याची शक्यता ही प्रमुख आव्हाने आहेत. या तंत्रज्ञानाचा चुकीचा वापर झाला तर त्याचे परिणाम अत्यंत गंभीर असू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे जागतिक राजकारणावरही परिणाम होत आहे. प्रगत तंत्रज्ञान असलेले देश अधिक शक्तिशाली होत आहेत, तर इतर देश मागे पडत आहेत. यामुळे जागतिक असमतोल वाढत आहे आणि नवीन प्रकारची शस्त्रास्त्र स्पर्धा सुरू झाली आहे. या परिस्थितीत काही उपाय आवश्यक आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर नियम आणि कायदे तयार करणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर नियंत्रित करण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे असणे आवश्यक आहे. मानवी नियंत्रण कायम ठेवणे आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

इराण विरुध्द इस्रायल-अमेरिका संघर्षाने दाखवून दिले आहे, की कृत्रिम बुद्धिमत्ता युद्धाचे स्वरूप पूर्णपणे बदलत आहे. ती युद्ध अधिक वेगवान, अचूक आणि प्रभावी बनवते, परंतु त्याच वेळी अनेक नैतिक आणि मानवी प्रश्न निर्माण करते. योग्य नियंत्रण नसेल तर हे तंत्रज्ञान मानवतेसाठी मोठा धोका ठरू शकते. कृत्रिम बुद्धिमत्ता एक शक्तिशाली साधन आहे. तिचा उपयोग कसा केला जातो यावर भविष्यातील जग अवलंबून आहे. ती युद्ध अधिक घातक बनवू शकते किंवा शांततेसाठीही उपयोगी ठरू शकते. म्हणूनच आजची सर्वात मोठी गरज म्हणजेकृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जबाबदारीने, नैतिकतेने आणि मानवहितासाठी करणे.

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

**चर्चा आजची**

# आला पावसाळा, अपूर्ण कामे पूर्ण करा!



राकेश लोहार

अलिबाग-रोहा आणि अलिबाग-मुरुड या महत्त्वाच्या मार्गांवर सुरू असलेली रस्त्यांची कामे आज 'विकास' या शब्दालाच काळिमा फासणारी ठरत आहेत. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना, रस्ते खोदून ठेवणे, गटारे मातीने बुजवून टाकणे आणि कामे अर्धवट अवस्थेत सोडण्याचा हा प्रकार केवळ निष्काळजीपणाच नाही, तर जनतेच्या सहनशीलतेची थट्टा आहे. म्हणूनच आता पावसाळा जवळ आल्याची चिन्हे दिसू लागल्याने, अपूर्ण कामेच आधी पूर्ण करणे सोयीचे होणार आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेली ही कामे अजूनही पूर्णत्वाच्या जवळ पोहोचलेली नाहीत. उलट, जिथे तिथे खोदकाम करून ठेवलेले, रस्त्यांवर टाकलेला मातीचा भराव, अर्धवट मोऱ्यांची आणि गटारांची कामे यामुळे संपूर्ण परिसरच असुरक्षित बनला आहे. अनेक ठिकाणी खोदलेल्या रस्त्याचा अंदाज न आल्याने दुचाकीस्वार पडून अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत. आजही अनेक ठिकाणी खोदलेल्या रस्त्यावर खडी आणि मातीमुळे मोटारसायकल चालवणे कठीण होऊन बसले आहे. चारचाकीतून फिरणाऱ्यांना याची झळ पोहोचलेली नाही. आजची परिस्थिती अशी आहे की, पावसाचा पहिला जोरदार सरीचा मारा झाला की ही सगळी माती वाहून जाईल आणि रस्ते चिखलाच्या दलदलित रूपांतरीत होतील, हे उघड आहे.

प्रशासनाला हा प्रश्न पडत नाही का, की पावसाळ्याच्या काळात लोक कसे प्रवास करणार? शाळकरी मुले, रुग्ण, कामगार यांच्याप्रमाणेच रोजच्या जीवनाशी निगडित प्रत्येकाला याचा निश्चितच फटका बसणार आहे. गटारांमध्ये आजही माती असून, काही ठिकाणी मोऱ्या खाली आणि गटारे वर अशीही कामे झाली आहेत. त्यामुळे मोठ्या प्रवाहाने येणारे पाणी यातून वाहणार तरी कसे? परिणामी, घराघरात पाणी घुसण्याचा धोका निर्माण झाला आहे. कारण गटारांमध्ये साचलेली माती अजूनही काढलेली नाही. पाणी वाहून जाण्याचा मार्गच बंद केला गेला आहे.

दरवर्षी पावसाळा येतो, तरीही दरवर्षी हीच चूक का केली जाते? हा केवळ अकार्यक्षमतेचा प्रश्न नाही, तर जबाबदारी झटकण्याची वृत्ती आहे. गतवर्षी साळाव ते तळेखार या रस्त्याची जी भयावह अवस्था झाली होती, ती अजूनही नागरिक विसरलेले नाहीत. रस्ते चिखलाने भरले, वाहनांची रांग लागली, अपघात झाले; परंतु, प्रशासनाने फक्त पाहात बसण्याची भूमिका घेतली. मात्र, यंदाही त्याच चुका पुन्हा केल्या जात आहेत, याहून मोठा दुर्दैव कोणते? याहून गंभीर मुद्दा म्हणजे, कामांची जबाबदारी बाहेरील ठेकेदारांकडे सोपवून स्थानिक परिस्थितीचा पूर्णपणे विचारच केला गेलेला नाही. कोकणातील मुसळधार पावसाचा अनुभव नसलेल्या ठेकेदारांकडून कामे करून घेतली जात आहेत. आणि त्यावर देखरेख करण्यासाठी असलेले अधिकारी प्रत्यक्षात किती वेळा साइटवर जातात, हा मोठा प्रश्न आहे.

कामांची गुणवत्ता, वेळेत पूर्तता, नागरिकांची सुरक्षितता या तिन्ही गोष्टींकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे आज परिस्थिती अशी आहे की, रस्ते अपूर्ण, गटारे बंद, आणि पर्यायी रस्तेसुद्धा धोकादायक बनले आहेत. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी आता स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा; विकास म्हणजे नेमके काय? फक्त निधी खर्च करणे आणि फलक लावणे म्हणजे विकास होतो का? की प्रत्यक्षात जनतेला सोयीस्कर आणि सुरक्षित सुविधा देणे हा विकासाचा खरा अर्थ आहे?

आज जनतेचा संयम संपत चालला आहे. लोकांच्या मनात संताप आहे, नाराजी आहे, आणि असहायतादेखील आहे. कारण, प्रत्येक वेळी आश्वासने दिली जातात; पण प्रत्यक्षात काहीही बदल होत नाही. आता वेळ आली आहे, ती ठोस निर्णयाची. नवीन कामांना तात्काळ ब्रेक लावा.जी कामे आता सुरू आहेत, ती आधी पूर्ण करा. गटारे साफ करा. रस्ते वापरायोग्य बनवा. नाहीतर पावसाळा सुरू झाला की परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाईल. मग ना अधिकारी दिसतील, ना ठेकेदार. फक्त जनता असेल चिखलात अडकलेली, त्रास सहन करणारी.

एसी केबिनमध्ये बसून फाईल्स हलवणाऱ्या अधिकाऱ्यांना कदाचित ही वेदना कधीच जाणवणार नाही. पण, जमिनीवर जगणाऱ्या सामान्य माणसासाठी हा प्रश्न रोजच्या जगण्याचा आहे. सरकार, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी आता केबिनच्या बाहेर पडून वास्तव पाहावे. कारण, जर यावेळीही परिस्थिती बदलली नाही, तर हा केवळ निष्काळजीपणा राहणार नाही, तर तो थेट जनतेविरुद्धचा अन्याय ठरेल.

**लोकसंसद**

## मुलांचा सुट्टीतील वेळ सत्कारणी लावा

आता मुलांच्या शालेय परीक्षा चालू आहेत. आता सुट्ट्या सुरु होतील. खरे तर सुट्टी हा मुलांच्या आयुष्यातला एक आनंदाचा क्षण असतो. कायमचा अभ्यासाचे ओझे असते. त्या ओझ्यापासून काही दिवस दूर. आता कोणीही अब्भ्यास करा असे म्हणणार नाही. ना शाळेत जावयाची घाई. सारे काई शांत. शांत. पालकही ही मुलांची अवस्था पाहत असतात पण मुलांची सुट्टी सत्कारणी लावणे अतिशय जरुरी आहे. त्यांना अभ्यासाला लावू नका पण अभ्यासू वातावरण निर्माण करा. त्यांना वाचनाची गोडी लावा. मुलांची मासिके वाचावयास द्या. मुले वाचनात रंगून जातील. त्यांना वर्तमानपत्रे वाचावयास द्या वर्तमानपत्रातील शब्दकोडे सोडवू द्यात या दृष्टीने मराठी तील संध्यानंद हे दैनिक अतिशय चांगले आहे. मुलांना गोष्टीची पुस्तके वाचावयास द्या. एखादे वाचनालय त्यांच्यासाठी सुरु करा. ती राम लक्षणांच्या कथेत रंगून जातील त्यांना दररोज दैनंदिन लिहावयास शिकवा. वेळ कसा खर्च होतो व दिवसाच्या घडामोडी दैनंदिनीत उमटु देत. त्यांना लिहावयाची सवयी लागेल व आपण दररोज काय करतो याचा स्वानुभव मिळेल. हल्लीबऱ्याचशहरातउन्हाळीसुट्टीचेवर्गअसतात. तेथे व्यायाम व इतर गोष्टी शिकवितात. शिस्त लावतात. सांघिक खेळ खेळावयास मिळतात. ज्यांना शक्य असेल त्यांना तेथे पाठवा. इतिहासातील अनेक गोष्टी त्यांनी ऐकलेल्या असतात. आता प्रत्यक्षात त्या अनुभवण्याची संधी द्या. त्यांच्या बरोबर प्रतापगड, सिंहगड, शिवनेरी किल्ले दाखवा. पुणे दर्शन मधून किंवा इत्तर शहरातून अशा दर्शन गाड्यांची सोय असते. नसेल तर स्वतःच्या वाहनातून त्यांना घेऊन जा. इतिहासातील प्रत्यक्ष क्षण अनुभवण्याची संधी त्यांना मिळेल ज्या मुलांचे हस्ताक्षर सुधारावयाचे आहे त्यांना दररोज हस्ताक्षराचे धडे द्या.

**- शांताराम वाघ, पुणे**

**दिनविशेष**

# टायटॅनिक स्मृती दिवस

टायटॅनिक हे त्याकाळचे जगातील सर्वात मोठे व समृद्ध जहाज होते. व्हाईट स्टार लाइन या शिपिंग कंपनीने तयार केलेल्या तीन भगिनी जहाजांपैकी ते एक वाफेवर चालणारे सर्वात मोठे प्रवासी जहाज होते. व्हाईट स्टार लाइन यांनी तयार केलेल्या तत्कालीन तीन मोठ्या जहाजांमध्ये टायटॅनिक, ऑलिम्पिक आणि ब्रिटानिकचा समावेश होत होता. टायटॅनिकला उत्तर अटलांटिक सागरातील सर्वात विलासी जहाजाचा दर्जा देण्यात आला होता. हे जहाज ५२,३१० टन वजनाचे होते. टायटॅनिक २६० मीटर लांब व ५० मीटर उंच जहाज असे होते. या जहाजाच्या बांधणीत ७.५ मिलियन डॉलरचा खर्च त्यावेळी आला होता. त्यावेळचे ७.५ मिलियन डॉलर म्हणजे आत्ताचे ४०० मिलियन डॉलर्स होय. या जहाजाचा दिमाख पंचतारांकित हॉटेल सारखा होता. प्रवाशांना जिम, प्लंज पूल, टर्किश बाथ, बार्बर शॉप, इलेक्ट्रिक लिफ्ट्स, लायब्ररी, रेस्टॉरंट आणि कॅफे यासह इतर सुविधांचा आनंद घेण्याची सोय या जहाजात करण्यात आली होती. आरएमएस टायटॅनिकने १० एप्रिल १९१२ रोजी साउथहॅम्प्टन, इंग्लंड येथून न्यूयॉर्क शहरापर्यंतच्या पहिल्या प्रवासास सुरुवात केली होती. जहाज कंपनीने जाहिरात केल्याप्रमाणे आकारमानामुळे हे जहाज कधीही बुडणार नव्हते. परंतु प्रवासाला सुरुवात केल्यानंतर चारच दिवसात या जहाजाला जलसमाधी मिळाली. बडे राजकारणी आणि कलाकारांपासून ते सामान्य प्रवाशांपर्यंत अनेकजण या जहाजाने प्रवास करत होते. ६२ वर्षीय एडव्हर्ड जॉन स्मिथ यांनी या जहाजाची धुरा सांभाळली होती. विशेष म्हणजे जहाजाला वाचवता न आल्याने त्यांनीही या जहाजासोबत जलसमाधी स्वीकारल्याचे सांगितले जाते. काहींच्या मते त्यांनी जहाज बुडत असताना गोळी घालून आत्महत्या केली. १४ एप्रिल १९१२ रोजी रात्री ११.४० वाजता हे जहाज एका हिमखंडावर आदळले, तीन तासांपेक्षा कमी कालावधीतच १५ एप्रिल रोजी पहाटे २ वाजून २० मिनिटांनी जहाज बुडाले आणि जहाजाच्या २२२३ प्रवाशांपैकी १५१७ जणांचा मृत्यू झाला.

१२ एप्रिल १९१२ रोजी प्रवास सुरू केल्यापासून दोन दिवसातच या जहाजाला पहिली आईस वॉर्निंग मिळाली होती. ज्या अटलांटिक सागरातून हे जहाज जात होते, त्या सागरात बर्फाचे मोठ डोंगर अस्तित्वात होते, त्यांना हिमनग वा आईसबर्ग असे म्हटले जाते. या बर्फाच्या डोंगरांचा अडथळा पार करण्यासाठी समुद्रातून जाणारी जहाजे नेहमीच आपल्या आजूबाजूच्या जहाजांना रेडिओच्या माध्यमातून संपर्क साधत असत, जेणेकरून कुठल्याही प्रकारची दुर्घटना टाळण्यास मदत होईल. अशाच प्रकारचा सावधतेचा इशारा अटलांटिक सागरातून त्यावेळी जाणाऱ्या काही जहाजांनी आरएमएस टायटॅनिकला दिला होता.

१४ एप्रिल २०१२ मध्ये या जहाजाला सात वेळा वॉर्निंग सिग्नल्स मिळाले. परंतु टायटॅनिक कधी बुडूच शकत नाही अशी खात्री असलेल्या जहाजाचे कॅप्टन एडव्हर्ड जॉन स्मिथ यांनी जहाजाचा वेग कमी केला नाही. १४ एप्रिलच्या रात्री आकाशात गडद काळोख होता. चंद्रदर्शनही झाले नव्हते, त्यामुळे रात्री गडद अंधारात ४० किमी वेगाने निघालेल्या जहाजाला लांब परंतु दृश्यमान असलेल्या हिमनगाचा अंदाज आला नाही. तो हिमनग जवळ येताच जहाजाच्या क्रोज नेट येथे बसलेल्या फेडरीक फ्लिट याने मोठ्या बर्फाच्या पर्वताची सूचना दिली. ही सूचना १४ तारखेला ११ वाजून ३९ मिनिटांनी देण्यात आली होती. यावेळी जहाज वळविण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु उशीर झाल्याने ११ वाजून ४० मिनिटांनी म्हणजे अवघ्या एका मिनिटाच्या फरकाने जहाज हिमनगावर आदळले. त्यामुळे जहाजाला अनेक ठिकाणी हादरे बसले. ही घटनेनंतर जहाजाच्या कॅप्टन व आर्किटेक्ट यांनी पाहणी केली असता जहाज बुडणार असल्याचे त्यांच्या लक्षात आले. जहाज व लोकांचे प्राण वाचविण्याकरता शर्थीचे प्रयत्न करण्यात आले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१५ एप्रिल**

१) श्रीम.सुनंदा शंकर ठोंबरे
श्रीबाग-२, अलिबाग,
दि.१५-४-१९४०

२)श्रीम.शुभदा शांताराम ढवळे
ब्राम्हण आळी, अलिबाग
दि.१५-४-१९४५

३)श्रीम.प्रतिमा पद्माकर पोवळे
श्रीबाग-३, अलिबाग
दि.१४-४-१९४९

**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

## श्रीवर्धन शहरात घंटागाड्या बंद असल्यामुळे
# कचरा उचलण्याचा प्रश्न गंभीर

**● समुद्रकिनाऱ्यावरील स्वच्छता थांबली**

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

व्हि. डी. के. फॅसिलिटीज या खाजगी कचरा उचलणाऱ्या ठेकेदाराचे कंत्राट संपल्यामुळे श्रीवर्धन शहरातील साफसफाईचे काम बंद पडले आहे. पुणे येथील ठेकेदार व्हि.डी. के. फॅसिलिटीज या कंपनीने श्रीवर्धन नगर परिषदेचे अनेक दिवसांपासून कचरा उचलण्याचे व साफसफाईचे कंत्राट घेतलेले होते. परंतु या ठेक्याची मुदत संपल्यामुळे कंपनीने काम बंद केले आहे. त्यामुळे शहरातील कचरा उचलणाऱ्या घंटागाड्यांवरील काम गारदेखील कामावर येत नसल्यामुळे श्रीवर्धन शहरातील कचरा उचलला गेला नाही. याच कंपनीचे लोक श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील धुप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती स्वच्छता करण्याचे काम करीत असत.



परंतु मागील आठवडाभरापासून श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील स्वच्छतेचे काम देखील थांबलेले असल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर अस्वच्छता पसरली आहे. अनेक लोकांनी कचऱ्याचे भरून ठेवलेले डबे तसेच असल्यामुळे दुर्गंधी पसरून रोगराईचा प्रश्न उत्पन्न होणार आहे. श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाकडून याबाबत कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. सदर ठेकेदार हा नगरपरिषदेकडून प्रती कामगार ६२७ रुपये इतकी रक्कम घेत होता. परंतु प्रत्येक चालक किंवा सफाई कामगार यांना फक्त प्रतिदिन ३३३ रुपये देण्यात येत होते. तर काम गारांना दोन ते तीन महिन्यांपासून वेतन देखील मिळालेले नव्हते. त्यामुळे कंत्राटी सफाई कामगारांमध्ये नाराजीचे वातावरण होते. मात्र सदर कंपनीने ठेका संपल्यामुळे काम बंद केले असल्यामुळे श्रीवर्धन शहरातील कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

श्रीवर्धन नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक होऊन नवीन सत्तास्थापना झाल्यापासून शहरातील अनेक कामे बारगळल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे थेट नगराध्यक्षपदाचे उमेदवार या निवडणुकीमध्ये पराभूत झाल्यामुळे, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी श्रीवर्धनकडे लक्ष देणे बंद केल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

समुद्रकिनाऱ्यावरील पार्किंगचा प्रश्न तातडीने सोडवणे गरजेचे आहे. र.ना. राऊत विद्यालयाच्या पटांगणातील पार्किंग लवकरच बंद होणार आहे. त्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती गाड्या उभ्या करण्यासाठी मोठी समस्या निर्माण होणार आहे. तरी याबाबतीत अदिती तटकरे यांनी लक्ष द्यावे. अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## नाबार्डकडून मच्छिमारांसाठी ६१ कोटी

**मुंबई :** नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी योजनेतून सागरी जिल्ह्यातील मच्छिमारांसाठी मासळी उतरविण्याच्या मुलभूत सोयी सुविधा उभारण्यासाठी ६१ कोटी २४ लाख रुपयांच्या कामांना मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निधीतून ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, पालघर आणि रत्नागिरी येथील विविध ठिकाणी पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. सागरी जिल्ह्यांमधील मच्छिमारांसाठी मासळी उतरविण्याच्या ठिकाणी मुलभूत सोयी सुविधा नसल्याचे आढळून आले आहे. यासाठी नाबार्डकडे सादर झालेल्या प्रस्तावातील काम पूर्ण झालेल्या तसेच प्रगतीपथावरील कामांसाठी हा ६१ कोटी २४ लाख रूपयांचा निधी वापरण्यात येणार आहे. यात ठाणे जिल्ह्यातील दिवाळे गाव, रायगड जिल्ह्यातील बोर्ली मांडला, दिघी, राजपूरी, नांदगाव, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग, पालघर जिल्ह्यातील धाकटी डहाणू, रत्नागिरी जिल्ह्यातील वेलदूर यांसह पाचू बंदर, बोऱ्या आणि चिंबई यांचा समावेश आहे.



## कीर्तन प्रशिक्षण शिबिराला प्रारंभ

**| पनवेल | प्रतिनिधी |**

विरुपाक्ष मंदिर ट्रस्ट, पनवेल यांच्या वतीने आयोजित तीन दिवसीय नारदीय कीर्तन प्रशिक्षण शिबिराला प्रारंभ झाला. येथील विरुपाक्ष मंदिर सभागृहाच्या कार्यालयात हे शिबीर संपन्न होत आहे.

या सोहळ्याला ट्रस्टचे अध्यक्ष नंदू पटवर्धन, विश्वस्त संदिप लोंढे, महेंद्र गोडबोले, राजन पेठे, यांच्यासह श्रीराम चितळे, चारुदत्त जोशी व नंदकुमार कर्वे उपस्थित होते. या शिबिरामधे ज्येष्ठ कीर्तनकार नंदकुमार कर्वे मार्गदर्शन करणार असून त्यामध्ये विविध सत्रांमधे नामांकित कीर्तनकारांची विविध विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्याने, चर्चासत्रे, आणि युवा कीर्तनकार सायली मुळ्ये व दर्शन वझे यांची कीर्तने असे या शिबिराचे स्वरूप असून राज्यभरातून अनेक प्रशिक्षणार्थी उपस्थित झालेले आहेत.

## माथेरानमध्ये प्लास्टिक रेनकोटवर पूर्णत : बंदी

**● पर्यावरण पर्यटन व नियोजन समितीने घेतला निर्णय**

**| माथेरान | प्रतिनिधी |**

पर्यावरण, पर्यटन व नियोजन समितीची बैठक समितीचे विद्यमान सभापती शिवाजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. माथेरान येथे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचे रेनकोट पर्यटकांसाठी विक्री केले जातात.

माथेरान हे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र असल्याने प्लास्टिकच्या रेनकोटवर पूर्णतः बंदी आणावी अशी मागणी पर्यावरण प्रेमी नागरिकांकडून सातत्याने होत होती. त्यामुळे आजच्या सभेमध्ये प्लास्टिकच्या रेनकोट विक्रीवर पूर्णतः बंदी



घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय समितीने घेतला. याची अंम लबजावणी याच मोसमात करण्यात येणार आहे.

पावसाळ्यात प्लास्टिकचे रेनकोट पर्यटक जाताना माथेरानच्या जंगलात कुठेही जंगलात फेकून देतात. यामुळे पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होतो. माथेरानच्या महात्मा गांधी रोडवर मॉल रोडच्या धरतीवर पर्यटकांना बसण्यासाठी आसन व्यवस्था करण्याचादेखील महत्त्वपूर्ण निर्णय समितीने घेतला आहे.त्यामुळे बाजारपेठेला सौंदर्य प्राप्त होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे

### जिल्हाधिकारी किशन जावळे

**| रायगड | प्रतिनिधी |**

शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रमाचे दुर्गराज रायगड येथे तारखेनुसार ६ जून व तिथीनुसार २६ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात येणार आहे.

यावर्षी शिवराज्याभिषेक सोहळा कार्यक्रमाला शिवप्रेमी नागरिकांची लाखोच्या संख्येने उपस्थिती राहणार असल्याने या कार्यक्रमांची पूर्वतयारी करताना संबंधित विभागांनी सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

या बैठकीस युवराजनी संयोगिता राजे भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल, उपजिल्हाधिकारी रविंद्र शेळके, यासह विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी तसेच अखिल भारतीय शिवराज्याभिषेक समिती, दुर्गराज रायगड समितीचे सदस्य उपस्थित होते.



जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून मोठ्या संख्येने शिवप्रेमी नागरिक किल्ले रायगड येथे येत असतात. यावर्षी होणाऱ्या सोहळा कार्यक्रमांसाठी आयोजकांकडून तयारी केली जात आहे.

यावर्षी कोणतीही समस्या उद्भवू नये या दृष्टीने आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यासाठी पूर्वतयारी केली जावी. येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांचे पार्किंग, पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता, प्रसाधनगृह, परिवहन व्यवस्था तसेच या कालावधीत आवश्यक असणाऱ्या विविध सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी सूक्ष्म नियोजन करून कार्यवाही करावी असे रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सूचित केले.

## बार्टीला नोटीस

**| पुणे | प्रतिनिधी |**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी २०२३ च्या पीएचडी संशोधकांसाठीची फेलोशिप जाहिरात अद्याप प्रसिद्ध न केल्यामुळे, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. आयोगाने अनुच्छेद ३३८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करत बार्टीच्या महासंचालकांना नोटीस बजावली असून ३० दिवसांच्या आत सविस्तर स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

## सामाजिक सप्ताहानिमित्त रक्तदान शिबीर



**| रायगड | प्रतिनिधी |**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवानिमित्त सामाजिक सप्ताह साजरा करण्यात येत असून, या उपक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय आवार, शासकीय अधिकाऱ्यांचे क्रीडा संकुल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके, तहसीलदार चंद्रसेन पवार, तहसीलदार डॉ. शितल रसाळ आदी उपस्थित होते.

## परिवहनच्या भ्रष्ट कारभारामुळे रस्ते अपघात

**● हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप**

**● परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राजीनामा द्यावा**

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राज्यभरातील रस्त्यांवर सातत्याने होत असलेले अपघात आणि त्यात मृत्यूमुखी पडणाऱ्या नागरिकांची संख्या पाहता रस्ता सुरक्षेच्या बाबतीत राज्य सरकार पूर्णतः अपयशी ठरल्याचे स्पष्ट दिसत आहे. परिवहन विभागाच्या भ्रष्ट कारभारामुळेच राज्यात अपघातांची व बळींची संख्या उच्चांकी पातळीवर पोहोचली आहे. या अपयशाची नैतिक जबाबदारी स्वीकारून राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तात्काळ राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

मुरबाड-कल्याण मार्गावर इको कारच्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ११ जणांना काँग्रेस पक्षाकडून श्रद्धांजली अर्पण करून, त्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी किमान १५ लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, तसेच या अपघाताला जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणीही त्यांनी केली.

**सरकारच्या अपयशामुळे अपघातांमध्ये वाढ**

काही दिवसांपूर्वीच समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात सात महिलांचा मृत्यू झाला होता, तर ६ मार्च रोजीही त्याच मार्गावर तीन मजुरांचा बळी गेला होता. मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, समृद्धी महामार्ग आणि मुंबईसह राज्यभारातील महामार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यात राज्य सरकार अपयशी ठरल्याचे दिसून येते.

कल्याणसह राज्यभरात विविध ठिकाणी क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक सुरु असून त्यातून अपघात घडतात, पण परिवहन विभागाचे अधिकारी व पोलीस हप्ते घेऊ याकडे दुर्लक्ष करतात. परिवहन मंत्र्यांनी भाजप आमदार नरेंद्र मेहतांच्या मालकीच्या जमिनीतील वाट्याच्या राजकारणात गुंतण्यापेक्षा नागरिकांच्या सुरक्षेकडे लक्ष दिले असते, तर अपघातांचे प्रमाण कमी झाले असते, असा टोला त्यांनी लगावला. हे अपघात परिवहन विभागाच्या गलथानपणाचे परिणाम आहेत, असे ते म्हणाले.

**पर्यटकांच्या सुरक्षेला मिळणार नवे बळ | पोलीस यंत्रणा अधिक सक्षम होणार**

# हरिहरेश्वर समुद्रकिनाऱ्यावर रोबोटिक वॉटर क्राफ्ट तैनात

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

हरिहरेश्वर समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी अत्याधुनिक रोबोटिक वॉटर क्राफ्ट तैनात करण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत जलद आणि प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी ही यंत्रणा उपयुक्त ठरणार आहे.

ही अत्याधुनिक उपकरणे रिमोटच्या सहाय्याने चालवली जातात आणि पाण्यात अडकलेल्या व्यक्तींपर्यंत अतिशय जलदगतीने पोहोचू शकतात. या क्राफ्टच्या माध्यमातून बुडणाऱ्या व्यक्तींना लाइफ सपोर्ट देणे, त्यांना



किनाऱ्यावर सुरक्षित आणणे किंवा आवश्यक ती मदत पोहोचवणे शक्य होते. या उपक्रमासोबतच जिल्हा पोलीस विभागाला गतीमान प्रशासन व आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण या योजनेअंतर्गत विविध अत्याधुनिक आपत्ती व्यवस्थापन साहित्यही वितरित करण्यात आले आहेत.

यामध्ये सर्च लाईट, मेगा फोन, मोठ्या प्रमाणात दोरखंड, आधुनिक ड्रोन, फ्ल्युरोसंट जॅकेट्स, नाईट व्हिजन बायनाक्युलर्स, रेस्क्यू रोप गन, बॉडी बॅग, आपत्ती व्यवस्थापन किट्स, अग्निशमन यंत्रे तसेच इमरजन्सी लाईटनिंग टॉवरचा समावेश आहे.

राज्य शासनामार्फत देखील इनोव्हेटिव्ह लाईफ जॅकेट, फोल्डेबल व मल्टीपरपज स्ट्रेचर, हेल्मेट, सेफ्टी नेट, गमबूट, हॅण्ड ग्लोव्हज, रॅपलिंग रोप यांसारख्या १० प्रकारच्या बहुपयोगी किट्स जिल्ह्यातील पोलीस ठाणे आणि पोलीस चौक्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

यामुळे केवळ समुद्रकिनाऱ्यावरच नव्हे तर इतर आपत्तीजन्य परिस्थितीतही पोलीस यंत्रणा अधिक सक्षम होणार आहे.

## निवडक

### धर्मरक्षेसाठी सकल हिंदू संमेलन



**रसायनी :** मोहोपाडा येथील जनता विद्यालयाच्या प्रांगणात सकल हिंदू संमेलन संध्याकाळी पार पडले.प्रमुख पाहुणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह कृष्णगोपालजी होते. स्वागताध्यक्ष वामन भोईर यांच्याहस्ते प्रमुख पाहुणे व मान्यवरांना तुळशीचे रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे कृष्णगोपाल, वामन भोईर, सच्चिदानंद कांबेकर, देवेंद्र भोजने, डॉ.सागर कांबळे, रजनी गायकवाड, ललिता दळवी, ताई पवार उपस्थित होते. कार्यक्रमासाठी तालुका पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, सरपंच उमा मुंढे, जि.प.सदस्या नेहा पारंगे आणि परिसरातील शेकडो हिंदू समाज बांधवांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे कृष्णगोपाल यांनी आपल्या भाषणात सांगितले की, हिंदू अत्यंत उदार व धार्मिक आहे. पूर्वी तो संघटित नसल्याने देशावर परकीय आक्रमणे झाली.त्यातूनही तो सावरला.हिंदू संघटित होण्यासाठी डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी सन १९२५ मध्ये नागपूरला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्याला नुकतीच १०० वर्षे पूर्ण झाली. हिंदूंनी हिंदूंची सुरक्षा केली पाहिजे पर्यावरण, तरूणाची व्यसनाधीनता यावर खूप कार्य करावे लागेल हे सांगितले. शेवटी संकल्प करण्यात आला, कुटुंबात संस्कार व एकता वाढवून समाजात समरसता निर्माण करीन.पर्यावरणाचे रक्षण आणि राष्ट्रभक्ती जोपासत जबाबदार नागरिक म्हणून राष्ट्राच्या प्रगतीसाठी सदैव कार्यरत राहीन.आपल्या परिसरात गोहत्या व धर्मांतरण होऊ देणार नाही असा सांकल्पही करण्यात आला. शेवटी सच्चिदानंद कांबेकर यांनी आशीर्वचन भाषण व आभार व्यक्त केले.पसायदान गायनाने समारोप झाला.

### ज्येष्ठ नागरिकांचे जनजागृती शिबीर




**रायगड :** सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने ज्येष्ठ नागरिकांसाठी जनजागृती शिबीर व मेळावा ज्येष्ठ नागरिक संघ हॉल, नागाव येथे पार पडला. हा कार्यक्रम सुनिल जाधव, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास राजश्री म्हात्रे, श्रीयश खरोटे तसेच समाज कल्याण विभागातील इतर कर्मचारी उपस्थित होते. प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रकाश सोरटे यांनी जेष्ठ नागरिकांना विविध आरोग्यविषयक समस्यांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित जेष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणीही करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजश्री म्हात्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीयश खरोटे यांनी केले. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### 'संघटन सृजन' अभियानाला प्रतिसाद




**पनवेल :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या आदेशानुसार सुरू असलेल्या संघटन सृजन अभियानाला पनवेल शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या अभियानाअंतर्गत ब्लॉक स्तरावरील पदाधिकारी निवड प्रक्रिया वेगाने सुरू झाली असून, त्याच पार्श्वभूमीवर पनवेलमध्ये महत्त्वाचा दौरा पार पडला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व पनवेल शहर समन्वयक श्रीरंग बरगे यांनी काँग्रेस भवन, पनवेल येथे भेट देऊन जिल्ह्यातील सर्व ब्लॉक व फ्रंटल सेल विभागांतील नव्या अध्यक्षांची निवड प्रक्रिया सुरू केली. जिल्ह्यातील सर्व आठ ब्लॉकमध्ये भेटी देत कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात आला. या दौऱ्यात १०० हून अधिक नियुक्त्यांसाठी शिफारशी प्रदेश काँग्रेसकडे पाठवण्यात आल्या. तसेच संघटन बळकटीकरणासाठी मार्गदर्शन करण्यात आले. ङ्गसंघटन सृजनफ अभियानामुळे काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी मिळून पक्षवाढीस गती मिळेल, असा विश्वास श्रीरंग बरगे यांनी व्यक्त केला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या कामगिरीने प्रभावित होऊन कार्यकर्त्यांमध्ये नव्या उत्साहाने काम करण्याची भावना निर्माण झाल्याचेही यावेळी स्पष्ट झाले. या उपक्रमामुळे पनवेल शहर जिल्ह्यात काँग्रेसचे संघटन अधिक मजबूत होऊन आगामी काळात पक्षाला मोठा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



(संजय गायकवाड)

### पाण्याविना विठ्ठलनगरवासीय तहानलेले

**कर्जत :** कर्जत नगरपरिषद कार्यालया शेजारीच असलेल्या विठ्ठल नगर वासियांच्या बाजूला टेकडीवर पाणीपुरवठा करणारी पाण्याची टाकी आहे, मात्र विठ्ठल नगरवासी यांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा करणारी टाकी डोक्याशी मात्र विठ्ठलनगर वासिय पाणी पासून उपाशी अशी परिस्थिती झाली आहे. कर्जत शहरात पाणीपुरवठा करणारी पाण्याची टाकी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या टेकडीवर आहे. त्यालाच लागून विठ्ठलनगर परिसर आहे पूर्वी विठ्ठल नगर परिसरामध्ये उच्च दाबाने पाणी पुरवठा होत होता अगदी दुसऱ्या, तिसऱ्या मजल्यापर्यंत पाणी सहज पोहोचत होते, मात्र आता सध्या पहिल्या मजल्यापर्यंत पाणीपुरवठा होत नसल्याने परिसरातील नागरिकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. याबाबत लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने लक्ष द्यावे पाणी समस्या दूर झाली नाही तर विठ्ठलनगर वासियांना नगरपरिषद कार्यालयावर धडक मारावी लागेल, असा इशारा विठ्ठलनगर वासिय नागरिकांनी दिला आहे.

# जिल्ह्यात डॉ.बाबासाहेबांना अभिवादन

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती जिल्ह्यात उत्साहात साजरी करण्यात आली. अनेक ठिकाणी सामाजिक, सांस्कृतिक तसेच धार्मिक स्वरूपात हा सण साजरा केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सोहळ्याचे औचित्य साधून जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यात विविध कार्यक्रम, रॅलीच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.**

## तंत्रनिकेतनमध्ये बाबासाहेबांच्या विचारांना उजाळा



**कोलाड :** कोलाड गोवे येथीलगीता.द. तटकरे तंत्रनिकेतन, व आयटीआय येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त संदीप तटकरे, रजिस्टार अजित तेलंगे, संस्थेचे प्राचार्य, विपुल मसाल, प्राचार्य संजय हजारे, शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. कॉलेजच्या वतीने बाबासाहेबांच्या विचारांना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

## जे.एस.एम. महाविद्यालयात समता सप्ताह साजरा


**| अलिबाग | प्रतिनिधी |**

क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या १९९ व्या आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीदिनानिमित्त ११ ते दि. १४ एप्रिल दरम्यान जे. एस. एम. महाविद्यालयात 'सामाजिक समता सप्ताह' उत्साहात साजरा करण्यात आला. मंगळवारी (दि.१४) एप्रिल रोजी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. गौतम पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह अंतर्गत महात्मा जोतिबा फुले जयंती ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती यामध्ये विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.




सामाजिक समता सप्ताहमध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यासपर्व उपक्रमाचे आयोजन ग्रंथालयाच्या अभ्यासिकेत करण्यात आले होते. महाविद्यालयातील ४५ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवून दररोज ८ तास वाचनाने महामानवास अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांचे मानवमुक्तीचे कार्य या विषयावर महाविद्यालयात निबंधलेखन स्पर्धेचे देखील आयोजन यावेळी करण्यात आले होते.

यांप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, प्र. प्राचार्य डॉ. नीलम हजारे विधी महाविद्यालय, उप प्राचार्य डॉ. प्रवीण गायकवाड, अजय सावंत तसेच अन्य प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## चवदार तळ्यावर आकर्षक विद्युत रोषणाई

**महाड :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३५ वी जयंतीनिमित्त चवदार तळ्यावर हजारोच्या संख्येने भीम अनुयायी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी हजर होते. या जयंती उत्सवाच्या पूर्वसंध्येला महाडमधील चवदार तळ्यावर चोहू बाजूने विविध रंगाची आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली. रात्री १२ वाजून दहा मिनिटांनी जयंती उत्सव समिती व तालुक्यातील सर्व संघटना एकत्रित येऊन डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जयंती उत्सव समितीचे कार्यकर्ते विविध संघटना व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप

**| माणगाव | प्रतिनिधी |**



माणगाव येथील द. ग. तटकरे महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार अरुण पवार यांनी अत्यंत प्रभावी व विचारप्रवर्तक भाषणातून आंबेडकरांच्या पत्रकारितेच्या कार्याचा गौरव केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लेखणीच्या सामर्थ्याने समाज परिवर्तन घडवून आणले, असे मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमात २३ गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. तसेच रांगोळी व भाषण स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा अरुण पवार, प्रा. खामकर आणि प्रा. आचार्य यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा निर्धार उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.

## मुरुडमध्ये ग्रंथ प्रदर्शन

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात समता सप्ताह डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्ताने महाविद्यालयाच्या ग्रंथालयात डॉ. बाबासाहेबांच्या ग्रंथाचे ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन वासंती उमरोटकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनाबद्दल विचार मांडले तर प्राचार्य डॉ. जे. के. कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनचरित्र कथन केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालयातील विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.प्राध्यापक डॉ. एस. एल. म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.





## रेवदंड्यात डॉ. बाबासाहेबांची जयंती उत्साहात

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त रेवदंडा येथील पंचशील युवक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करत शिका, संघटित व्हा हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. यावेळी सुरेंद्र म्हात्रे हे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी बाबासाहेबांचे विचार आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ असल्याचे सांगितले.

यांप्रसंगी संतोष मोरे, सुरेश खोत, संदीप खोत, निलेश खोत, सुराराम माळी, खलील तांडेल, अशोक नाईक, सुहास घोणे, इक्बाल फटाकरे, आसिफ गोंडेकर, हर्षल घरत, शरद वरसोलकर, सरोज वरसोलकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मधुकर गायकवाड, नितीन गायकवाड, सचिन पवार, सागर गायकवाड, गौरव गायकवाड, सतीश पवार, अमोल गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले होते.

## राजकीय-सामाजिक नेत्यांची उपस्थिती

उरण : उरण नगरपरिषदेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माजी आ. मनोहर भोईर, नगराध्यक्षा भावना घाणेकर, नरेश रहालकर, संदेश ठाकूर, रवी भोईर, विनोद म्हात्रे, मिलिंद पाडगावकर, राजू ठाकूर, अतुल ठाकूर, अमित पाटील, जसीम गॅस, सायली म्हात्रे, सायली पाटेकर, वंदना पवार, प्रमिला पवार, दमयंती म्हात्रे, गोपाळ पाटील, रमेश म्हात्रे, संतोष पवार, प्रकाश कांबळे, दत्ता म्हात्रे, आदी उपस्थित होते.

## गौतम बुद्धांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

**| नेरळ | प्रतिनिधी |**


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कर्जत तालुक्यातील डिकसल येथे शांतीदूत विहारामध्ये भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. डॉ. नंदकुमार तासगावकरांच्या माध्यमातून मंडळाला देण्यात आली. ही मूर्ती ढोल ताशाच्या जल्लोषात रायगड हॉस्पिटल येथून शांतीनगर येथे आणण्यात आली.



यावेळी नागसेन कांबळे, अ‍ॅड. रमाकांत तरे, महेश काशिद, कुशाग्र पटेल, चंद्रकांत गायकवाड, किशोर गायकवाड, नितीन गायकवाड, विजय पवार, अर्चना गायकवाड, भारती भोईर, पूर्वा गायकवाड, हिराबाई हिरे, रेखा साळवी, संगीता गायकवाड, पुष्पलता गायकवाड, रेखा गायकवाड, रेखा जाधव, तनुजा गायकवाड, शुभांगी साळवी, मंगल वाघ, कमल ब्राह्मणे, मनिषा सोनवणे, श्वेता गायकवाड, मोनिका गायकवाड, सारिका हिरे, रूपाली तांबे, करुणा वाघपंजे, प्रणाली गायकवाड, प्रेरणा गायकवाड, तृष्णा गायकवाड, सचिन गायकवाड, अशोक गायकवाड, विक्रांत ब्राह्मणे, प्रमोद चव्हाण, उमेश गायकवाड, शैलेश हिरे, निखिल गायकवाड, मनोज गायकवाड, रत्नदीप हिरे, अजिंक्य हिरे आदी उपस्थित होते.



● तळा तालुक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त जमलेल्या भीम अनुयायांनी तळा शहर भीममय झाले होते.



● पनवेलमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रांगोळी कलाकार नवीन मोरे यांनी आकर्षक रांगोळी साकारली आहे.

## पुई येथे पिंपळ वृक्ष लागवड

**| कोलाड | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील पुई येथे मंगळवारी (दि.१४) एप्रिल रोजी सिद्धार्थ गायकवाड यांनी पिंपळ वृक्ष लागवड करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३५ वी जयंती साजरी केली. नको आम्हाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीसाठी डीजे, नको आम्हाला नाच गाणे, आम्ही देणार महामानवांच्या जयंतीनिमित्त ऑक्सिजन रूपी पिंपळ वृक्षाचा साज, ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवून बाळा गायकवाड, मोरे, जाधव, काटकरांच्या संकल्पनेतून



पिंपळाच्या झाडाची लागवड करून मानवंदना देण्यात आली. यावेळी कोमल चाफे, अशोक धामनसे, आत्माराम दिवेकर,चिंतू दिवेकर दळवी आदी उपस्थित होते.




## क्रांतिभूमी ते चैत्यभूमी जादा बस

महाड : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती दिनाचे औचित्य साधत महाड आगाराचे आगार प्रमुख रितेश फुलपगारांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतिभूमी ते चैत्यभूमी अशी जादा बस सोडण्यात आली. प्रवाशांचा महाड पासून दादर आणि दादरपासून महाड असा प्रवास या बसच्या माध्यमातून झाला. महाड पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष निलेश पवार यांनी याबाबत विशेष पाठपुरावा केला होता. यावेळी चंद्रकांत कोकणे, रितेश फुलपगार, निलेश पवार, मिलिंद माने, दिनेश पिसाट, उदय हाटे आदी उपस्थित होते.




● आरसीएफ वसाहतीतील बुद्धविहारामध्ये विश्वशांती बुद्धविहार समितीच्यावतीने आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे, दिनेश कवाडे, संजय वानखेडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. (छायाचित्र: समीर मालोदे)

## डिकसळ येथील शांतीनगरमध्ये व्याख्यान

**| नेरळ | प्रतिनिधी |**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कर्जत तालुक्यातील डिकसळ येथील शांतीनगर येथे व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नवी मुंबई येथील आगरी कोळी कराडी युथ फाऊंडेशन सीए निलेश पाटील यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी निलेश पाटील यांनी सर्वांनी विपश्यना कोर्स करण्याचे आवाहन केले. सुरुवातीला सीए निलेश पाटील यांचा शांतिदूत मंडळाचे वतीने अध्यक्ष नितीन पाटील यांचा सत्कार शांतिदूत मंडळाचे अध्यक्ष नितीन गायकवाड उपाध्यक्ष प्रमोद गायकवाड, कार्याध्यक्ष प्रमोद वाघमारे यांचे हस्ते करण्यात आला तर सायकलपटू हिरेन हिसालके यांचा सत्कार रमाबाई महिला मंडळाच्या अध्यक्ष अर्चना गायकवाड, भारती भोईर, हिराबाई हिरे यांच्या उपस्थितीत करण्यात आला होता.

यावेळी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, उपाध्यक्ष शिवाजी कराळे, मनोहर हजारे, संदीप म्हसकर,अंकुश शेळके, मिलिंद विरले, दामत, किशोर घारे, सुभाष नाईक, सचिन गायकर, पंकज बुंधाटे, राम हिसालके, अ‍ॅड. विपुल हिसालके, अ‍ॅड. ठोंबरे, किशोर गायकवाड, मदन हिरे, समीर गायकवाड, सचिन गायकवाड आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अ‍ॅड. उत्तम गायकवाड यांनी केले.



● अलिबाग सार्वजनिक वाचनालय अलिबागतर्फे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना १३५व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

## मेडिकल कॉलेजमध्ये मिरवणूक

**नेरळ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त कर्जत तालुक्यातील रायगड हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेज येथे मिरवणूक काढण्यात आली. संस्थेचे पदाधिकारी आणि कर्मचारी यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी यादवराव तासगावकर, डॉ. नंदकुमार तासगावकर, वंदना तासगावकर, राहुल गायकवाड, नागसेन कांबळे, डॉ. कुशाग्र पटेल, रमाकांत तरे, महेश काशीद, आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. हॉस्पिटलमधील कॉर्पोरेट कार्यालयाच्या बाहेर असलेल्या प्रतिमांचे पूजन करण्यात आली. यावेळी निळे झेंडे आणि पताका यांनी परिसरात निळाई पसरली होती.

## डॉ. बाबासाहेबांच्या विचाराचा जागर

**| खोपोली | प्रतिनिधी |**

जग युध्दाची भाषा करत युध्दाचे रणशिंग फुंकत असताना खोपोली नगरपालिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त व्याख्याने आयोजित करून बुध्दांची भाषा बोलतोय असे गौरवउद्गार प्रख्यात लेखक, संजय आवटे व्याख्यान करताना काढले आहे. या व्याख्यानातून संविधानातील मूल्यांची जाणीव आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा नव्याने अधोरेखित झाली.

यावेळी महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करताना, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडावरील समाधीचा शोध लावून शिवचरित्र समाजासमोर आणले, याची विशेष आठवण करण्यात आली. स्त्री शिक्षणाची क्रांती, जातीभेदाविरुद्धचा संघर्ष आणि सत्यशोधक समाज स्थापनेद्वारे समता व बंधुतेचा विचार रुजवण्यातील त्यांचे योगदान अधोरेखित करण्यात आले.

या कार्यक्रमास कुलदीपक शेंडे, अनिल सानप, सुवर्णा मोरे, अमित फाळे, संदीप पाटील, विनायक तेलवणे, सुनिल पाटील, स्वेला अहिर, विनिता कांबळे, हर्षदा गायकवाड, अश्विनी अत्रे, सुमती कोळंबे, उल्हाराव देशमुख, यशवंत गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



● पनवेलमध्ये लोकसहभागातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली. (छायाचित्र: राजेश डांगळे)

# रेवदंडा पंचशील नगरात भव्य मिरवणूक



। रेवदंडा । प्रतिनिधी ।

रेवदंड्यातील पंचशील नगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने पंचशील नगर ग्रामस्थांच्यावतीने भव्य सजावट, आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. यावेळी व्यासपीठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य प्रतिमा स्थापित करण्यात आली होती.

या कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. सायंकाळी पंचशील नगर ते रेवदंडा बाजारपेठ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत ग्रामस्थ, महिला व युवकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नितीन गायकवाड, मधुकर गायकवाड, सचिन पवार, सतीश पवार, ऋतिक पवार, गौरव गायकवाड, अमोल गायकवाड, जीवन जाधव आदींनी विशेष परिश्रम घेतले.


## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र चौ. मी. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| रईस सईद डोंगरे | १३१/९/अ/११ | २०३-०० | २०-३० |
| | १३१/९/अ/१२ | ३१९-०० | ३१-९० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १५/०४/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकती श्री. पंकज भगवान दळवी यांच्या मालकी हक्काच्या असून सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांन बरोबर खरेदी देण्याच्या हेतुने बोलणी करीत आहे. सदर मिळकतीत इतर कोणाचाही विक्री, देवाण-घेवाण, गहाण, वारसा, ताबा, खरेदीखत, बक्षीस, मृत्यूपत्र वाटपपत्र वा इतर कोणत्याही प्रकारचा करारनामा वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास व मिळकत विकण्यास कोणाचीही हरकत असल्यास त्याच्या पृष्टर्थ सर्व कागदोपत्री पुराव्यासोबत खालील पत्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत लेखी सुचित करणे आवश्यक आहे. जर अशाप्रकारची कोणतीही लेखी हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील नमुद केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल व ज्याचा कोणाचा कोणत्याही प्रकारे तथाकथित हक्क हितसंबंध इ. आहे तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे समजून आमचे आशिल सदर मिळकतींचा प्रस्तुतची मुदतीनंतर सदर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत हरकत असल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर खालील नमुद केलेल्या मिळकतींचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे -वणी, तालुका - खालापुर, जिल्हा-रायगड**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | १६४ | ०-१८-०० | ०.०९ |
| २ | १६७ | ०-१९-०० | ०.१९ |

दिनांक :-१५/०४/२०२६
स्थळ :- खोपोली

**सौ. वैशाली सुनिल कराळे**
ॲडव्होकेट
फ्लॅट नं.-५ वैभव-समृद्धी
काटरंग, खोपोली,
खालापूर, जि. रायगड. ४१०२०३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे जि. रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग २२/७, क्षेत्र ०-३२-१० हे. आर., पो. ख. ०-००-५० हे. आर. एकूण क्षेत्र ०-३२-६० हे. आर., आकार १.३७ रू. पै. या मिळकतीपैकी मालकीचे क्षेत्र ०-१६-३० हे. आर. आकार ०.६७ रू. पैसे ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) रसिका कवेश म्हात्रे २) रूपाली नवनीत म्हात्रे ३) रूपाली राम म्हात्रे व ४) रोशन राम म्हात्रे सर्व रा. मु. भुते, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिदध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १४/०४/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

दि.१५/०४/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक १) श्री.राजिव माणिकलाल बोकारिया, २) कविता वसंत बोकारिया, ३) करमवीर युगराज जैन यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विकी व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| न्हावे ता.रोहा | ३०९ | ३-१६-०० पो.ख १-२३-०० एकुण ४-३९-०० | २.६३ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी १) श्री.राजिव माणिकलाल बोकारिया यांच्या हिश्यातील क्षेत्र ०-४९-३० हे.आर पो ख ०-३०-७० हे.आर, एकुण क्षेत्र ०-८०-०० हे.आर, आकार २. ३८ रू.पै २) कविता वसंत बोकारिया यांच्या हिश्यातील क्षेत्र ०-४९-३० हे. आर पो.ख ०-३०-७० हे.आर, एकुण क्षेत्र ०-८०-०० हे.आर, आकार २.३८रू.पै ३) करमवीर युगराज जैन यांच्या हिश्यातील क्षेत्र १-२९-३० हे.आर पो ख ०-३०-७० हे.आर, एकुण क्षेत्र १-६०-०० हे. आर, आकार ०.९९ रू.पै इतक्या क्षेत्राच्या मिळकती या जाहिर नोटीसीचा विषय आहेत.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी पो. पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं.९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-डोणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-चौमी | आकारणी |
|---|---|---|---|---|
| श्री. राजेंद्र महादेव बोडके | १३ | १/क | ३-२४-०० | २-८५ |

यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे हे.आर.चौ.मी क्षेत्र ०-२९-९९ इतके क्षेत्र येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत
नगरपालिका कार्यालयाशेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- १५/०४/२०२६
मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेल:-adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नंबर २५५/४, क्षेत्र ०-२०-०० हे. आर., पो. ख. ०-००-२० हे. आर. एकूण क्षेत्र ०-२०-२० हे.आर., आकार ४.७५ रू. पै. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. गजानन तुकाराम वाकटी २) श्री. पंढरीनाथ तुकाराम वाकटी ३) श्री. हरेश्वर तुकाराम वाकटी ४) देवता देवेंद्र डवले ५) सुभद्रा तुळशीराम सरदार ६) जनाबाई तुकाराम वाकटी सर्व रा. मु. पो. वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १४/०४/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. योगेश मातीराम बजाज यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत करार भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमत: पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ६५/२/१/२/१ | ०-६०-०० | ४.०४ |

अलिबाग,
दिनांक : १४/०४/२०२६.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन-२, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड,
मो.-९८२२५२८९३१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल सौ. सोनल सुहास मोकल आणि श्री. दर्शन मधुकर देशमुख यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे विद्यमान मालक श्री.अजय बिपिन हुडिवाला यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्वे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ५० | ८ | ४०४-०० | ४०-४० |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकविस दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

दि. १५/०४/२०२६.

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता - शॉप नं. ९, समर्थ कृपा
हौसिंग सोसायटी नेरळ, महेश टॉकीज
जवळ, नेरळ ता, कर्जत, जि. रायगड
पिनकोड नं. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **जाहिरात : 'विहीर' आपल्या शेती, वाडी, बंगला सोसायटीत पाण्याच्या** सोयीसाठी RCC रिंगाची विहीर बनवून घेण्यासाठी संपर्क करा. रणजित पाटील. फोन : ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७ अलिबाग

● **झिराड आणि मांडवा येथील** दुकानात पीकअप आशयर व ४०७ वर ड्रायवर हवे आहेत. संपर्क - ८००७८९३२३२

● **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३

● **फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला** मुले पाहिजेत १२/१५ वी पास, १५००० महिना, ठिकाण- बामणसुरे संपर्क -९८२३५८५३२१

● **बोअरवेल/विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे** भूजल संशोधन व केमिकल ट्रीटमेंट द्वारा जुन्या बोअरवेलचे पाणी वाढवणे. ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६

● **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर,रेस्टॉरंट कॅप्टन, हाऊसकिपिंग सुपरवायझर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसॲपवर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२

● **नवीन बांधकाम चालू असलेल्या** बिल्डिंग मध्ये 1BHK फ्लॅट (sqft - ६४२) विकणे आहे. श्री स्वामी समर्थ नगर पिंपळभाट अलिबाग संपर्क : ९८८१३७१४०७

● **शेतावर राहून काम करण्या**साठी जोडपे पाहिजे. संपर्क - ९८२२००१८५३

● **पाहिजेत- पाण्याच्या पंपाच्या** दुकानात कामासाठी कायमस्वरूपी शिकाऊ कामगार, प्लंबर, मेकॅनिक पाहिजे. तसेच कॉन्ट्रक्ट बेसीसवर काम करण्यासाठी मेकॅनिक पाहिजेत. बाहेरगावच्या व्यक्तसाठी राहण्याची सोय. संपर्क - ९८२२००१८५३

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे अशिल यांच्याबरोबर चालु आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

मौजे वळवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील ग्रुप ग्रामपंचायत बेलोशी हद्दीतील घर मालमत्ता नं. ३७२ क्षेत्र ५१९ चौ. फुट ४८.२३ चौ. मी. ही घर मिळकत.

तरी वरील घर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विकी व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. अमर अशोक घरत,**
मोबा.नं.७७९८९३०७०८
८८०५०३७४७४

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे किहिम, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १) आदित्य किरण पोतदार २) किरण पुरूषोत्तम पोतदार यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर बिनशेती मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| किहिम ता.अलिबाग जि.रायगड | २१६/१ | एकूण क्षेत्र ३१३.३०.०० | ३१३३.०० |

वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र २.५५.०० आर. चौ.मी., आकार २५.५० रू.पैसे

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, कराराररदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक १५/०४/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो.झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं.९८२२१८६७४०

## PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY

**Teaching Staff Required**

Prabhakar Patil Education Society is one of the leading Education society, working since 2001. We run various English-medium schools (affiliated with CBSE and the State Board) located at Veshvi (Alibag), Nagaon, Sambari (Kurdus), and Khalapur.

**Requirement :** Teachers for Pre-Primary, Primary and Secondary Sections.

**Subjects:** English, Mathematics, Science, Social Studies, Sanskrit, French, Art & Craft, Physical Education (P.T.), Karate, Marathi, Hindi.

**Qualification for Teachers :** Post Graduates or Graduates with M.Ed., B.Ed., D.Ed., ECCED, M.P.Ed., or B.P.Ed.

**Note:** Fluency in English is mandatory.

**Salary Scale:**
Teachers: Upto 30,000 per month,
(Salary will be commensurate with experience and qualifications.)

**For More Details Please Contact & Apply On:**
Rajashree Patil – 9892150116
Email: pnp.rajashree@gmail.com
Ankit Bhanushali – 9823897088
Email: ankitbhanushali02@gmail.com

**Interview Date :-** 27th April 2026
Timing :- 12 p.m. to 4 p.m
Venue :- PNP Education Society's Central office, Opposite Durg Suruchi Vada, Veshvi, Alibag, 402201

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक मैथाली महिंद्र (महेंद्रकुमार) भगत व राजेश्री राजेश मते, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| रेवदंडा ता.अलिबाग | १५७/१/१/ब/१अ | ०-३४-५० पो.ख.०-००-५० एकूण ०-३५-०० | १७.३५ |

वर नमुद बागायत जमिन मिळकतीमधील मैथाली महिंद्र (महेंद्रकुमार) भगत व राजेश्री राजेश मते यांच्या सामाईकात नावे असलेले खाते क्र. १८०६७ क्षेत्र ०-०६-३५ हे.आर., पो. ख. ०-००-५० हे.आर., एकुण क्षेत्र ०-०६-८५ हे.आर., आकार ३.२० रु. पैसे या मिळकतीबाबत

दिनांक १५/०४/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे मालेगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली बिनशेती जमिन मिळकत आमचे अशिल सौ.लता दत्तात्रय कर्वे व सुदर्शन दत्तात्रय कर्वे यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. वसंत पावणू महाजन यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं./प्लॉट नं. | क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ७२ | ६ | ४.७३.०० | ०९.४६ |

वरील वर्णन केलेल्या बिनशेती जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १५/०४/२०२६.

सही / -
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं.४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

## :: जाहीर नोटीस ::

सर्व लोकांस कळविण्यांत येते की,

मिळकतींचे वर्णन :-गांव तळवली, ता. मुरुड, जि. रायगड गट क्रमांक व उपविभाग- ३३६, एकुण क्षेत्र हे. आर. २.३७.७०, आकारणी २७.२६ पैकी ज्योत्स्ना अनिल महाले, तुषार अनिल महाले, विनी विलास देसाई यांचे नांवे दाखल असलेले क्षेत्र हे. आर. ०.१५.०५, आकार रु. पैसे. १.९४, ही मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी मिळकतीचे विद्यमान मालकांकडून नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

वरील मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतीचे विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही वहिवाट, गहाण, दान, लिज, फरोक्त, भागीदार, बक्षिस मृत्युपत्रांकीत दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात दिवसांत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागावुन येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

लक्ष्मीखार मुरुड,
ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड
पिन नं. ४०२४०१.
दि. १५/०४/२०२६

सही/-
**ॲड. एम.जे.तांबडकर,**
बी.कॉम.एल.एल.एम.,
ॲडव्होकेट व नोटरी



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक



### वैशालीचा पराभव, पण अजूनही शर्यत मात्र खुली

**पाफोस :** भारताच्या आर. वैशाली हिने आव्हानवीरांच्या बुद्धिबळ स्पर्धेतील आपले वर्चस्व अबाधित ठेवण्याची संधी गमावली. चीनच्या जिनर झू हिच्याविरुद्धच्या लढतीत तिचा पराभव झाला. यामुळे आता बाराव्या फेरीनंतर जिनर झू व आर. वैशाली यांच्यामध्ये प्रत्येकी सात गुणांसह बरोबरी आहे. आता या स्पर्धेतील दोन फेऱ्या अद्याप शिल्लक आहेत. आर. वैशालीसमोर १३व्या फेरीमध्ये चीनची माजी विश्वविजेती झोनगी टॅन हिचे आव्हान असणार आहे. आर. वैशाली हिने ११व्या फेरीपर्यंत आपला पहिला क्रमांक कायम राखला होता. मात्र, रविवारी रात्री झालेल्या १२व्या फेरीत तिचा जिनर झू हिच्याविरुद्धच्या लढतीत पराभव झाला. यामुळे आता या दोन्ही खेळाडूंमध्ये बरोबरी झाली आहे. वैशाली हिच्यासाठी अखेरच्या दोन फेऱ्या अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत. १३व्या फेरीमधये झोनगी टॅन हिचा तिला सामना करावयाचा आहे. तसेच अखेरच्या अर्थातच १४व्या फेरीमध्ये आर. वैशाली हिला रशियाच्या कॅटरीना लॅगनो हिला लढा द्यावा लागणार आहे. स्पर्धेत बाजी मारणारा खेळाडू विश्वविजेत्या जू वेनजुन हिच्याशी दोन हात करणार आहे. या लढतीतील विजेता त्यानंतर नवा विश्वविजेता होणार आहे. आव्हानवीरांच्या स्पर्धेतील महिला विभागात आता कमालीची चुरस दिसून येत आहे. चार खेळाडूंना आव्हानवीरांची स्पर्धा जिंकण्याची संधी निर्माण झाली आहे. जिनर झू (७ गुण), आर. वैशाली (७), बिबिसारा असॉबायेवा (६.५) व ॲना मुझीचूक (६.५) यांच्यात चुरस आहे.जावोखिर जेतेपदाच्या उंबरठ्यावरआव्हानवीरांच्या खुल्या स्पर्धेमध्ये उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोव याचे वर्चस्व प्रकर्षाने दिसून येत आहे. त्याने नऊ गुणांची कमाई करीत पहिले स्थान पटकावले आहे. आता ही स्पर्धा जिंकण्यासाठी त्याला फक्त एका ड्रॉ लढतीची गरज आहे. तो या स्पर्धेतील विजेता ठरेल हे निश्चित आहे. याचा अर्थ या वर्षअखेरीस विश्वविजेत्या डी. गुकेशला विश्व अजिंक्यपदाच्या लढतीत जावोखिर सिंदारोव याचे आव्हान असणार आहे.

### वैभव सूर्यवंशी करणार टीम इंडियात पदार्पण

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२६ मध्ये १५ वर्षांचा वैभव सूर्यवंशी धुमाकूळ घालत आहे.आयपीएल पदार्पण, अंडर-१९ क्रिकेट आणि अंडर-१९ विश्वचषकातील त्याच्या उत्कृष्ट कामगिरीने सातत्याने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. वैभवची मोठे फटके खेळण्याची क्षमता आणि आक्रमक दृष्टीकोन यामुळे तो अवघ्या काहीच चेंडूत मोठी खेळी साकारतो. त्याची ही कामगिरी पाहून वैभवला लवकरच भारतीय संघात आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधी दिली पाहिजे, अशी सातत्याने मागणी होत आहे. आता वैभवच्या पदार्पणाचा मार्ग मोकळा झाला आहे. आयपीएल २०२६ मध्ये वैभव सूर्यवंशी राजस्थान रॉयल्सकडून खेळत आहे. सलामीवीर वैभवने आतापर्यंत दोन वेळा १५ चेंडूत अर्धशतक करण्याचा विक्रम केला. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील उत्कृष्ट गोलंदाज असलेले जसप्रीत बुमराह, भुवनेश्वर कुमार आणि जोश हेझलवुडच्या गोलंदाजीवर त्याने षटकारांची आतिषबाजी केली. आयपीएलनंतर जून २०२६ मध्ये होणाऱ्या भारताच्या आयर्लंड दौऱ्यासाठी वैभव सूर्यवंशीची निवड होण्याची शक्यता आहे. इंग्लंडच्या व्हाईट-बॉल दौऱ्यापूर्वी होणाऱ्या या छोट्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत निवड समिती या १५ वर्षीय खेळाडूला मोठी संधी देऊ शकते. बीसीसीआयच्या सूत्रांनी ही मोठी माहिती दिली आहे. तो आयर्लंड दौऱ्यासाठीच्या दावेदारांपैकी एक असून, निवड समितीने इतर अनेक खेळाडूंसोबत त्याचं नाव शॉर्टलिस्ट केलं आहे, असं सूत्रांनी सांगितलं. या डावखुऱ्या फलंदाजाने गेल्या हंगामात जगातील काही सर्वोत्कृष्ट गोलंदाजांना धूळ चारली होती. या वर्षीही तो आपला फॉर्म कायम ठेवत खेळत आहे.या हंगामात आतापर्यंत वैभव सूर्यवंशीने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध २६ चेंडूंमध्ये ७८ धावा, चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध १७ चेंडूंमध्ये ५२ धावा आणि मुंबई इंडियन्सविरुद्ध १४ चेंडूंमध्ये ३९ धावा केल्या आहेत.

# आयपीएलच्या वेळापत्रकात बदल

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

**आयपीएल २०२६ स्पर्धेत (२०२६) रविवारी १२ एप्रिलपर्यंत एकूण २० साम न्यांचं यशस्वीरित्या आयोजन करण्यात आलं आहे. सहभागी एकूण १० संघांनी प्रत्येकी ४-४ सामने खेळले आहेत. तर प्रत्येक संघासाठी पाचवी फेरी फार निर्णायक ठरणार आहे. त्याआधी बीसीसीआयने मोठी घोषणा केली आहे. बीसीसीआयकडून १९ व्या मोसमाच्या वेळापत्रकात अचानक बदल करण्यात आला आहे.**




बीसीसीआयकडून एकूण २ सामन्यांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. या २ सामन्यांची तारीख आणि ठिकाण बदलण्यात आलं आहे. चेन्नई सुपर किंग्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळवण्यात येणाऱ्या दोन्ही संघांच्या सामन्यांमध्ये हा बदल करण्यात आला आहे.

बीसीसीआयने सोमवारी १३ एप्रिल रोजी प्रसिद्धीपत्रकाद्वारे या बदलाबाबत माहिती दिली आहे.

यंदा १९ व्या मोसमात गुजरात टायटन्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्स यांच्यात २ सामने खेळवण्यात येणार आहेत. उभयसंघातील पहिला सामना हा २६ एप्रिल रोजी होणार आहे.

गुजरात विरुद्ध चेन्नई यांच्यातील सामन्याला अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये दुपारी ३ वाजून ३० मिनिटांनी सुरुवात होणार होती. मात्र आता हा सामना त्याच वेळेस मात्र वेगळ्या स्टेडियममध्ये होणार आहे. हा सामना चेन्नईतील एमए चिदंबरम स्टेडियममध्ये होणार आहे.

चेन्नई विरुद्ध गुजरात यांच्यातील दुसरा सामना २१ मे रोजी चेन्नईत आयोजित करण्यात आला होता. हा सामना एमए चिदंबरम स्टेडियममध्ये होणार होता. मात्र या सामन्याचं ठिकाण बदण्यात आलं आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार उभयसंघातील २१ मे रोजी होणारा सामना चेन्नईऐवजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये होणार आहे. या सामन्याला संध्याकाळी साडे सात वाजता सुरुवात होणार आहे. दरम्यान गुजरात आणि चेन्नई दोन्ही संघांनी १९ व्या मोसमात एकूण आणि प्रत्येकी ४ सामने खेळले आहेत.

गुजरातने ४ पैकी २ सामने जिंकले आहेत. तर चेन्नईला ४ पैकी फक्त १ सामनाच जिंकता आला आहे.

### वेळापत्रकात बदल कशामुळे?

आगामी निवडणुकांमुळे बीसीसीआयने या २ सामन्यांच्या वेळापत्रकात बदल केला आहे. सध्या ५ राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. तर अहमदाबाद महानगरपालिकेसाठी येत्या २६ एप्रिलला मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी मोठ्या प्रमाणात सुरक्षा गरजेची असते. त्यामुळे २६ एप्रिल रोजी अहमदाबादमधील नियोजित सामन्यात बदल करण्यात आला आहे.

## श्रमिक महोत्सव उत्साहात संपन्न

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

श्रमिकच्या महोत्सवाला आधुनिकतेची जोड देताना मुंबईच्या महिला कबड्डीपटूंनी नऊवारी साडीत सादर केलेली रॅम्प चढाई हा खास आकर्षण ठरला. नृत्यदिग्दर्शक गुरु कोरेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली ललिता सुर्वे, लता कंटक, प्रतिमा मांजरेकर, जयश्री सुवर्णा, म नीषा गावंड, तृप्ती सुवर्णा, हिम ाली नार्वेकर, हर्षदा नलावडे, दीपा पेडणेकर आणि सोनम पोळे यांनी ए राजे जी रं जी या गीतावर सादर केलेल्या देखण्या सादरीकरणाने उपस्थितांची मनं जिंकली. श्रमिकमध्ये प्रवेश करताच स्वयंसेवकांनी मनगटावर शिक्का मारत आणि हातात लिंबाच्या गोळ्या देत केलेलं स्वागत आणि क्षणात काळ जणू मागे फिरला! स्टॅम्प इथे मारा म्हणत दिग्गजही बालपणीच्या आठवणीत हरवले. मैदानावरचे ते निरागस क्षण पुन्हा

## चिंचवली गोहे संघ प्रथम

**मैत्री चषक, नाईट क्रिकेट स्पर्धा**

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

प्रिन्स इलेव्हन क्रिकेट संघ कलोते यांच्या वतीने मैत्री चषक, नाईट क्रिकेट सामने कलोते येथे आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धेत या परिसरातील ४८ नामवंत संघानी सहभाग नोंदविला, होता. अतितटीच्या सामन्यात प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले चिंचवली गोहे संघ, द्वितीय क्रमांक जीवन इलेव्हन संघ मोरबे, तसेच तृतीय कांढरोळी, चतुर्थ कैरे, पाचवा नावंढे, सहावा माजगाव असे क्रमांक काढण्यात आले.




या सामन्यात अंतिम विजेत्यास प्रथम क्रमांकास एक लाख रुपये, द्वितीय क्रमांक पन्नास हजार तर तृतीय, चतुर्थ, पाचवा, सहावा क्रमांक यांस पंचवीस हजार रुपये व चषक देण्यात आले. या सामन्यात जिवन इलेव्हन संघ मोरबे, संघाचा पराभव करून चिंचवली गोहे संघ यांनी प्रथम क्रमांक पटकावले. यामध्ये सहा संघाना क्रमांक देण्यात आले. विजेत्या संघास आकर्षक चषक देण्यात आले. उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक, मालिकावीर यांस उत्तम बक्षिस देण्यात आले. या क्रिकेट सामन्यासाठी आलेल्या प्रेक्षकांना लकी ड्रॉ ठेवण्यात आले होते. यामध्ये प्रथम क्रमांक इलेक्ट्रिकल स्कुटी गौरव कदम वावंढळ, तसेच दुसरे बक्षीस स्मार्ट फोन शिदेश अंबरे, तृतीय वाशिंग मशीन सुप्रिया मिरगळ मुळगाव यांस प्राप्त झाले.

या क्रिकेट सामन्यांचे आयोजन दिपक पाटील, अशोक पाटील, प्रमोद पाटील, तुकाराम पाटील, प्रियांग दिपक पाटील, आर्यन पाटील, प्रिंस पाटील, अशोक देशमुख, भाई साळुंखे, उज्वल ठोंबरे, गुरुनाथ पालांडे केशव ठोंबरे, रामचंद्र पाटील, सुभाष काईनकर, ज्ञानेश्वर साळुंखे, संतोष ठोंबरे, अप्पा ठोंबरे, नितीन पाटील, तसेच प्रितम दादा म्हात्रे, मोनिका ताई कांबळे, सुधीर शेठ ठोंबरे, प्रफुल विचारे यांची उपस्थिती लाभली.

हे सामने पाहण्यासाठी या परिसरातील सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, ग्रामस्थ, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा प्रेमी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## तिरंगा चषक क्रिकेट स्पर्धा

## बामण डोंगरी क्रिकेट संघ विजेता

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

चिरनेर - भोम काँग्रेस आय व युवक काँग्रेस कमिटीच्या वतीने, आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेतील तिरंगा चषक २०२६ चे अजिंक्यपद बामण डोंगरी क्रिकेट संघाने पटकाविले. त्यांना रोख दीड लाख रुपये व आकर्षक तिरंगा चषक देण्यात आला. तर ग्रीष्मा इलेव्हन मोठीजुई क्रिकेट संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. त्यांना ७५ हजार रुपये रोख रक्कम व आकर्षक तिरंगा चषक प्रदान करण्यात आला.

मरूआई क्रिकेट विंधणे संघांने तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना रोख पस्तीस हजार रुपये व आकर्षक तिरंगा चषक देण्यात आला. मायरा क्रिकेट कळंबुसरे संघ चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला. त्यांना रोख ३५ हजार रुपये व आकर्षक तिरंगा चषक प्रदान करण्यात आला. ही क्रिकेट स्पर्धा चिरनेर येथील मातोश्री मैदानावर चार दिवस आयोजित करण्यात आली होती. यामध्ये ३२ संघानी भाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या मोठीजुईच्या निनाद भोईर याला मालिकावीर म्हणून गौरविण्यात आले त्याला बाईक देण्यात आली. तर उत्कृष्ट फलंदाजाचा मान विंधण्याच्या आकाश पाटील याने पटकावला. गोलंदाज म्हणून साहिल म्हात्रे तर क्षेत्ररक्षक म्हणून बामणडोंगरीच्या शुभम पाटीलला गौरविण्यात आले.

## सावन बरवालचा नवा राष्ट्रीय विक्रम

**| रॉटरडॅम | वृत्तसंस्था |**

हिमाचल प्रदेशचा धावपटू सावन बरवाल याने रविवारी (ता. १२) ऐतिहासिक कामगिरी केली. त्याने एन. एन. रॉटरडॅम येथील पूर्ण मॅरेथॉन (४२ किमी) शर्यत दोन तास, ११ मिनिटे व ५८ सेकंदांत पूर्ण करीत भारतासाठी राष्ट्रीय विक्रम नोंदवला.याआधी १९७८मध्ये शिवनाथ सिंग याने दोन तास १२ मिनिटांमध्ये पूर्ण मॅरेथॉन शर्यत पूर्ण करीत भारताचा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला होता. तब्बल ४८ वर्षांनंतर हा विक्रम मोडीत निघाला हे विशेष.

सावन बरवाल याने भारतासाठी राष्ट्रीय विक्रमाला गवसणी घातली; मात्र एलिट मॅरेथॉनपटूंमध्ये त्याला २०व्या स्थानावर समाधान मानावे लागले; मात्र तरीही त्याने केलेली कामगिरी काबिल ए तारीफ ठरली आहे. तसेच या शर्यतीत भारताच्या आणखी एका खेळाडूने सहभाग घेतला होता. त्याचे नाव गोपी थोनाकल हे होय. त्याने दोन तास १३ मिनिटे व १६ सेकंदांत शर्यत पूर्ण केली. त्याला २३व्या स्थानावर समाधान मानावे लागले.

**अर्ध मॅरेथॉनप्रसंगी २७ व्या स्थानी**

रॉटरडॅम येथील मॅरेथॉन शर्यतीदरम्यान सावन बरवाल याने उत्तरार्धात मोठी झेप घेतली. २१ किमी अर्थातच अर्ध मॅरेथॉन पूर्ण झाली असताना तो २७व्या स्थानावर होता. त्याने एक तास, चार मिनिटे व ४३ सेकंदात २१ किमीची शर्यत पूर्ण केली होती; पण उत्तरार्धात त्याने मुसंडी मारली. अर्थात ३५ किमीच्या शर्यतीनंतर तो १९व्या स्थानावर पोहोचला होता. पूर्ण मॅरेथॉन शर्यत पूर्ण झाली असता तो एक स्थानाने खाली आला. त्याने २०वे स्थान पटकावले.

### महिला टी-२० विश्वचषक

## बक्षीस रक्कम वाढली

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने पुढील वर्षी होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषकासाठी बक्षीस रकमेची घोषणा केली आहे. इंग्लंड आणि वेल्समध्ये होणाऱ्या या स्पर्धेची एकूण बक्षीस रक्कम वाढवून ८२ कोटी रुपये करण्यात आली आहे, जी २०२४ च्या तुलनेत १० टक्के जास्त आहे. मागील वेळी बक्षीस रक्कम ७.९५ दशलक्ष डॉलर (सुमारे ७४ कोटी रुपये) होती. जून-जुलैमध्ये इंग्लंडमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत यावेळी अधिक संघ आणि अधिक सामने पाहायला मिळतील. स्पर्धा जिंकणाऱ्या संघाला २१.८ कोटी, उपविजेत्याला १० कोटी आणि उपांत्य फेरीत हरणाऱ्या संघाला ६.२९ कोटी रुपये मिळतील. तर प्रत्येक गट सामना जिंकल्यावर संघाला २९ लाख रुपये मिळतील.

## स्पर्धांसाठी आता दोन संघांचा सहभाग?

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

विश्वकरंडक व आशियाई स्पर्धा या दोन महत्त्वाच्या मालिका यावर्षी १५ ऑगस्ट ते ४ ऑक्टोबर या कालावधीत होत आहेत. या दोन मानाच्या स्पर्धांमध्ये भारताचे दोन भिन्न हॉकी संघ सहभागी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. केंद्रीय क्रीडा मंत्रालयाच्या सूत्रांकडून याबाबतचे संकेत दिले आहेत.



याबाबतचा निर्णय अंतिम झाल्यास विश्वकरंडक व आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये भारताचे पुरुष व महिला अशा दोन्ही विभागातील दोन भिन्न संघ सहभागी झालेले दिसणार आहेत.विश्वकरंडकाचे आयोजन १५ ते ३० ऑगस्ट यादरम्यान बेल्जियम-नेदरलँड्स येथे होणार आहे. त्यानंतर आशियाई क्रीडा स्पर्धा १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर यादरम्यान जपानमध्ये पार पडणार आहे. या दोन्ही स्पर्धांमध्ये १९ दिवसांचा फरक आहे.

मात्र, तरीही पुरुष व महिला अशा दोन्ही विभागातील हॉकीपटूंच्या मानसिक व शारीरिक क्षमतेचा कस लागणार आहे. त्यामुळे या दोन्ही स्पर्धांमध्ये दोन भिन्न संघ पाठवण्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, भारतीय पुरुष हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन व महिला हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक शूर्ड मराईन यांनी दोन्ही स्पर्धांसाठी एकच संघ पाठवण्याला प्राधान्य दिले आहे.

क्रीडा मंत्रालयाच्या सूत्रांकडून या वेळी सांगण्यात आले की, आशियाई क्रीडा स्पर्धा ही ऑलिम्पिकसाठीची पात्रता फेरी असणार आहे. या स्पर्धेमध्ये भारताचा अ संघ सहभागी व्हायला हवा. याबाबत राष्ट्रीय हॉकी संघटनेला कळवण्यात आले आहे.

**मातीतील खेळांचा समावेश राष्ट्रकुल स्पर्धेमध्ये | क्रीडामंत्री मनसुख मांडवीयांची माहिती**

# कबड्डी खो-खोला जागतिक मंचावर संधी?

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतामध्ये २०३०मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. या प्रतिष्ठेच्या क्रीडा स्पर्धेमध्ये क्रिकेट व हॉकी या खेळांसह महाराष्ट्राच्या मातीतील खेळांना प्राधान्य देण्यात येणार आहे. कबड्डी, खो-खो, मल्लखांब आणि योग या चारपैकी दोन मातीतील खेळांचा समावेश राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेमध्ये करण्यात येणार आहे. केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांच्याकडून सोमवारी याबाबतची माहिती देण्यात आली.



राष्ट्रकुल क्रीडा मंडळाचे शिष्टमंडळ मागील आठवड्यात भारतामध्ये आले होते. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा अहमदाबाद या शहरामध्ये आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या तयारीचे मूल्यांकन करण्यासाठी त्यांनी येथील दौरा केला. याप्रसंगी अध्यक्ष डोनाल्ड रुकारे, सीईओ कॅटी सॅडलेयर, संचालक डॅरेन हॉल, ॲन लुईस मॉर्गन, एक्स्पर्ट नील कार्ने या पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांची भेट घेतली. या बैठकीत स्पर्धा तयारी आणि त्यानंतर सुविधांचा वापर यावर सविस्तर चर्चा झाली.

मनसुख मांडवीय या वेळी म्हणाले, की क्रिकेट व हॉकी या दोन खेळांचा समावेश २०३०मधील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत निश्चित करण्यात येईल. तसेच कबड्डी, मल्लखांब, खो-खो आणि योग या चारपैकी दोन खेळांनाही प्राधान्य देण्यात येणार आहे. यामध्ये ॲथलेटिक्स, पॅरा ॲथलेटिक्स, जलतरण, पॅरा जलतरण, टेबल टेनिस, पॅरा टेबल टेनिस, बोल्स, पॅरा बोल्स, वेटलिफ्टिंग, पॅरा पॉवरलिफ्टिंग, जिम्नॅस्टिक्स, नेटबॉल, बॉक्सिंग या खेळांचा समावेश असणार आहे. २०३०मधील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेमध्ये १७ क्रीडा प्रकारांच्या शर्यती रंगणार आहेत.

यंदा ग्लासगो येथे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या क्रीडा स्पर्धेमध्ये १० खेळांचाच समावेश करण्यात आला आहे. यामधून क्रिकेट व हॉकी या दोन खेळांना वगळण्यात आले आहे. २०१०मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर आता २०३०मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा भारतात होणार आहे. तब्बल २० वर्षांनंतर भारतामध्ये या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. नायजेरियावर मात करीत भारताने यजमानपदाचा मान यंदा मिळवला आहे. या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी भारत प्रयत्न करताना दिसेल. २०३६ मध्ये भारत ऑलिंपिक आयोजनासाठी प्रयत्न करीत आहे.

### फॉर्म्युला वन शर्यतीचे पुनरागमन?

राष्ट्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांनी या वेळी फॉर्म्युला वन या कार रेसिंग शर्यतीच्या भारतामधील आयोजनाचेही संकेत दिले. ते म्हणाले, की फॉर्म्युला वन ही आंतरराष्ट्रीय शर्यत तीन सलग वर्षांमध्ये ग्रेटर नॉएडा येथील बुद्ध आंतरराष्ट्रीय सर्किटवर आयोजित करण्यात आली. मात्र त्यानंतर कर व नोकरशाहीतील अडथळ्यांमुळे २०१३ नंतर या शर्यतीच्या आयोजनाला पूर्णविराम लावण्यात आला. आता मात्र २०२७ पासून ही शर्यत पुन्हा भारतात खेळवण्याची आशा निर्माण झाली आहे. तीन कंपन्या शर्यतीचे आयोजन करण्यासाठी पुढे आलेल्या आहेत.

## हैद्राबादने केला राजस्थान रॉयल्सचा पराभव

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

इशान किशनच्या नेतृत्त्वाखालील सनरायझर्स हैदराबाद संघाने राजस्थान रॉयल्सवर ५७ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासह हैदराबाद संघाने राजस्थानचा विजयी रथ रोखला.

सनरायझर्स हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना या सामन्याक २० षटकांत ६ बाद २१६ धावांची खेळी केली. यानंतर राजस्थान संघाला हैदराबादच्या नव्या गोलंदाजांनी धावा करण्याची संधी दिली नाही. प्रफुल हिंगे व साकिब हुसैनच्या गोलंदाजीसमोर राजस्थान रॉयल्सचा संघ १५९ धावांवर सर्वबाद झाला.

हैदराबादने दिलेल्या २१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानच्या संघाने पहिल्याच षटकात गुडघे टेकले. प्रफुल हिंगने वैभव सूर्यवंशी, ध्रुव जुरेल व लुहान डे प्रिटोरियस यां तिघांना शून्यावर बाद केलं. यानंतर दुसऱ्या षटकात साकिब हुसैनने यशस्वी जैस्वालला एका धावेवर बाद केलं. यानंतर रियान पराग प्रफुल हिंगेचा बळी ठरला. यानंतर रवींद्र जडेजा व डोनावव फरेरा या जोडीने ७२ चेंडूत ११८ धावांची भागीदारी रचली. पण संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. डोनावर फरेरा ६९ धावा करत बाद झाला. तर रवींद्र जडेजा ३२ चेंडूत ५ चौकारांसह ४५ धावा करत बाद झाला. यानंतर अखेरच्या षटकांमध्ये तुषार देशपांडेने ११ चेंडूत ३ षटकारांसह २५ धावांची खेळी केली. याशिवाय खालच्या फळीतील फलंदाजांना झटपट माघारी धाडण्याचं श्रेय साकिब हुसैनला जातं.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)